१९६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१३०

मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या
इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, क्र. ६.

# इतिहास--संशोधन--पद्धति

REFBK-0014379

कै. मो. पंडित

64543
223179
2936

# इतिहास संशोधन पद्धति

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

लेखक :

श्री. केशव मोहनीराज पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५१५३ वि: निबंध
2936 223179

द्वितीय आवृत्ति

जानेवारी १९६५

किंमत ७५ पैसे

REFBK-0014379

98379

# निवेदन

मराठी भाषेंत इतिहासशास्त्रावर लिहिलेला हा पहिलाच स्वतंत्र निबंध होय. हा निबंध 'ग्रंथमाले'त कै. विष्णु गोविंद विजापूरकर यांनीं कोल्हापूर येथील 'श्री समर्थप्रसाद' छापखान्यांत इ. स. १९०५ त क्रमशः प्रसिद्ध केला. नंतर तो पुस्तक रूपांतहि प्रकाशित झाला.

या निबंधांत इतिहासलेखन हें इतिहासशास्त्राला धरून कां व्हावयास पाहिजे, व अशा शास्त्रशुद्ध लेखनाकड पाहण्याची वाङ्मयलेखक किंवा साहित्यिकाची दृष्टीहि त्याच लेखनपद्धतींतील तत्त्वांनांच अनुसरून असण्याची आवश्यकता कां आहे याचें थोडक्यांत विवेचन कै. के. मो. पंडित यांनीं करून दिलें होतें. बहुतेक लेखन लँगलॉय व सिनेबो यांच्या ग्रंथाधारें केलेलें आहे. महाराष्ट्रेतिहास-संशोधन-लेखनांतील निरनिराळया विशिष्ट समस्या सोडविण्यांत जरूर असणाऱ्या सूत्रांचा यांत समावेश झालेला नाहीं. कारण स्पष्टच आहे कीं, त्या काळीं महाराष्ट्रीय इतिहासाच्या साधनांच्या चिकित्सेसाठीं शास्त्रशुद्ध नियम सूत्रित करण्याइतकीं ऐतिहासिक साधनें उपलब्ध झालेलीं नव्हतीं व त्या साधनांचा व्हावयास पाहिजे होता तितका चिकित्साभ्यास झाला नव्हता. मात्र या निबंधांत इतिहासलेखनांत शास्त्र-शुद्धता पाळावयास जरूर असणारीं जीं सामान्य तत्त्वें सर्वत्र स्वीकारलीं गेलीं जातात त्यांची या निबंधांत चांगली ओळख करून दिलेली होती. परंतु आजहि चांगल्या साहित्यिकांनीं आणि विशेषतः ऐतिहासिक पुस्तकांवरील टिकाकारांनीं ह्या सामान्य तत्त्वांचीहि ओळख करून घेण्याची कोशिस केलेली नाहीं असें हरघटकीं दिसून येतें. निरनिराळया प्रसंगांच्या ऐतिहासिक सत्य वस्तुस्थितीपेक्षां त्यांस काल्पनिक उठाव, मग तो पूर्व संस्कारांनीं सूचित झालेला असो किंवा इतर कांहीं भौतिक स्वार्थ-परार्थांच्या आकर्षणामुळें असो, दिला पाहिजे असाच या वाङ्मयलेखकांचा आग्रह दिसतो. परंतु हें त्यांच्या या इतिहासशास्त्रांतील सामान्य तत्त्वांचा विसर पडल्यानें होत असतें यांत शंका नाहीं. इतिहासशास्त्र हें ललितवाङ्मयकलेहून कांहीं वेगळें

आहे याची त्यांना जाणीव झालेली नसते. इतर कलाशास्त्रांच्या पुस्तकांपासून ते जशी अलिप्तता राखतात तशी तीं इतिहास, तत्त्वज्ञान यांसारख्या विषयाबाबत राखित नाहींत. याचें मुख्य कारण म्हणजे मध्यंतरीच्या काळांत गोष्टीरूप इतिहासावरच जो अधिक भर दिला गेला त्यामुळें ते या गोष्टीरूप इतिहासाचेंच आदर्श शास्त्रशुद्ध चिकित्सक इतिहासलेखांना लावतात व साहजिकच काल्पनिक चित्रांकडे त्यांची अधिक ओढ राहाते. परंतु या अनिष्ट वळणानें आपला शास्त्रशुद्ध इतिहास जनतेपर्यंत जात नाहीं. तसेंच कादंबरीच्या ऐतिहासिक कथानकांनीं महाराष्ट्राच्या कर्तृत्वशक्तीच्या परंपरेचें जें सदोष स्वरूप परकीय व परदेशस्थ लोकांत प्रसृत केलें आहे त्यामुळें त्यांच्यांत ज्या महाराष्ट्रियांच्या सांस्कृतिक जीवनाबाबत असत्य कल्पना रूढ झाल्या आहेत त्यांचा निरास होणें जड आहे. त्यांच्या मनांत उद्भवलेल्या या भ्रामक कल्पना दूर करण्यास आपला सत्येतिहास पूर्ण समर्थ आहे याची जाणीव साहित्यिकांना होईपर्यंत या दिशेनें प्रयत्न होण्यास जितकें इतिहासलेखकांस उत्तेजन मिळावें तितकें मिळणार नाहीं. इतिहासाकडे पहाण्याची दृष्टि शास्त्रशुद्धच राहिली पाहिजे ही जाणीव कै. पंडितांच्या काळीं विद्वानांत झाली होती हें स्पष्ट आहे. परंतु ती जाणीव त्यांच्या प्रयत्नामुळें प्रकर्षानें वाढीस लागावयास पाहिजे होती तशी ती वाढीस लागली नाहीं, इतकेंच नव्हे तर ती जाणीव नष्ट होत असल्याचीच साक्ष पटते. इतिहासाभ्यासूंचें सध्याचें प्रमाण व प्रयत्न, उच्च शिक्षणांत इतिहासाभ्यासाचें स्थान, महाविद्यालयीन इतिहासाच्या प्राध्यापकांच्या संशोधकीय लेखांची इतर शास्त्रांतील संशोधकीय लेखांशीं तुलना, हीं सर्व महाराष्ट्राचे इतिहासाभ्यासाकडे कसें व किती दिवसेंदिवस दुर्लक्ष होत चाललें हें सहज समजून देण्यास समर्थ आहे. अशा परिस्थितींत नवीन इतिहासाभ्यासेच्छूंस मार्गदर्शनार्थ हें प्रारंभीचें उपयुक्त साधन पुनर्मुद्रित करून दिलें जात आहे.

१-१-१९६५

इतिहास संशोधन मंडळ,
१७२, नायगांव क्रॉस रोड,
दादर-मुंबई १४.

वा. सी. बेंद्रे

# इतिहास – संशोधन – पद्धति

[ (१) उपोद्घात, (२) कागदपत्रांचा शोध, (३) इतिहासकारांस साह्यकारक ज्ञान, (४) ऐतिहासिक ज्ञानाचें सामान्य स्वरूप, (५) बाह्यचर्चा—खुद्द कागदपत्रांसंबंधीं चर्चा, (६) बाह्यचर्चा—कागदपत्रांच्या कर्तृत्वाचें परीक्षण, (७) बाह्यचर्चा—कागदपत्रांतील माहितीचें एकीकरण व त्या कागदपत्रांचें वर्गीकरण, (८) बाह्यचर्चा व तिचें महत्त्व, (९) आंतील चर्चा—अर्थाबद्दल चर्चा, (१०) लेखकाच्या इमानाविषयीं चर्चा, (११) विशेष गोष्टींचा निर्णय, (१२) उपसंहार. ]

उपोद्घात :

इतिहास हें एक शास्त्र आहे; आणि म्हणून तत्संबंधीं शोध, रचना व अभ्यास ह्या सर्व गोष्टी शास्त्रीय पद्धतीनेंच झाल्या पाहिजेत. प्रकृतच्या लहानशा निबंधांत 'ऐतिहासिक शोध करण्याची पद्धति' कशी असावी, याचा फार पाल्हाळ न लावतां, आटोपसर रीतीनें विचार केलेला आहे.

कागद पत्रांचा शोध कसा करावयाचा, त्यांचा संग्रह कसा करावयाचा. त्यांचे संशोधन कसें करावयाचें व त्यांवरून ऐतिहासिक गोष्टींची सत्यता कशी ठरवावयाची; त्याचप्रमाणें, प्राचीन काळीं घडलेल्या गोष्टींपैकीं संभवनीय भाग कोणता व महत्त्वाचा भाग कोणता हें कसें ठरवावयाचें इत्यादि गोष्टीचें या निबंधांत विवेचन केलें आहे.

विद्वानांनीं ठरविलेल्या शास्त्रीय पद्धतीनें ऐतिहासिक शोध करून, शास्त्रीय पद्धतीनेंच इतिहास ग्रंथाची रचना झाली म्हणजे, विद्वानांच्या मतें तो ग्रंथ सशास्त्र रीतीनें तयार झाला, असें म्हणावयाचें हें कांहीं सोपें काम नाहीं. या शास्त्रीय पद्धतीविषयीं माहिती मिळाल्यावर प्रत्येकाची अशी खात्री होईल कीं, इतिहासकारास इतिहास हें शास्त्र सोपें नसून फार अवघड आहे. त्याचप्रमाणें, भाषेच्या दृष्टीनें पाहणाऱ्या वाचकास एखादें ऐतिहासिक विषयाचें पुस्तक वाचनीय व मनोरंजक वाटलें; म्हणून, तें इतिहास-शास्त्रदृष्ट्या चांगलें असेलच, असा कांहीं नियम नाहीं. सदहू प्रमाणानेंच एखादें कठीण व वाचण्याला कंटाळवाणें पुस्तक वाईटच असावयाचें असेंहि पण सांगता यावयाचें नाहीं. एखादा ग्रंथ शास्त्रीय दृष्टीनें उत्तम असून वाचण्यालाही कंटाळवाणा वाटत नाहीं. सत्यता आणि भाषा-सौंदर्य या दोन गोष्टी परस्पर विरोधीच आहेत, असें कांहीं म्हणतां येत नाहीं. तथापि कोणत्याही इतिहास ग्रंथाचें महत्त्व त्याच्या भाषाशैलींत नाहीं; तर त्यांतील बिनचुक माहिती, पूर्ण अवलोकन व खोल विचारपद्धति ह्यांत आहे. सारांश, भाषापंडितांस असें आढळून येईल कीं, इतिहासशास्त्रावरील ग्रंथ वाचणें, म्हणजे गणितशास्त्रावरील एखादा ग्रंथ वाचण्याइतकेंच अवघड आहे, व त्या ग्रंथाचे योग्यायोग्यतेविषयीं आपला अभिप्राय प्रगट करण्यास त्यास कोणत्याहि तऱ्हेचा अधिकार नाहीं. तो अधिकार त्या त्या शास्त्राचा जन्मभर व्यासंग असलेल्या इतिहासशास्त्रकोविदांचाच आहे.

अमुक एक ठिकाणीं शिवाजी असें वागला, हें त्याचें वागणें बरोबर होतें किंवा चुकीचें होतें; अथवा भाऊसाहेबांची अमकी एक वर्तणूक वाईट होती किंवा चांगली होती, हें ठरविण्याचें काम इतिहासकाराचें नव्हे. तो विचार नीतिशास्त्रज्ञांचा अगर धर्मशास्त्रज्ञांचा आहे. जें काय इतिहासकाराचें कर्तव्य आहे तें एवढेंच कीं, त्याजजवळ असलेल्या निरनिराळ्या पुराव्यांवरून शेवटीं तात्पर्यांश काय निघतो तो काढावयाचा, आणि शिवाजी किंवा भाऊसाहेब याच्यावर त्यांच्या प्रतिपक्षांनीं ठेविलेल्या आरोपांची शाबिती होते किंवा काय हें जवळ असलेल्या पुराव्यांवरून सिद्ध करावयाचें; अथवा त्याला कोणतीही गोष्ट सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा मिळत नसल्यास दोन पक्षांपैकीं खरेपणाचा कांटा कोणत्या पक्षाकडे झुकण्याचा संभव आहे, हें तर्कशक्तीनें कारणें दाखवून सिद्ध करावयाचें; साराश नीति, धर्म, स्वदेशाभिमान किंवा कला हा इतिहासशास्त्रज्ञाचा हेतु नसून, सत्यान्वेषण, सत्यसंशोधन व सत्यप्राप्ति हाच एक त्यांचा हेतु आहे, व असला पाहिजे. खरोखर सत्यान्वेषणाचा व्यासंग जरी बिकट असला तरी तो चित्तास विलक्षण लोभनीय वाटतो!

## (२) कागदपत्रांचा शोध :

इतिहासकार कागदपत्रांच्या साह्यानें इतिहास लिहितो. मागील काळच्या लोकांच्या विचाराचें व कृतीचें ज्ञान आपणांस कागदपत्रांच्या योगानें होतें. परंतु किंचित विचार केला असतां आपणांस असें आढळून येईल कीं मागील लोकांच्या विचाराचें व कृतीचें फारच थोडे ज्ञान आपणांस प्राप्त झालें आहे. याचें कारण उघड आहे. ज्यांच्या योगानें आपणांस त्याचें ज्ञान व्हावयाचें ते कागदपत्र फारच अल्पकाळ टिकतात. त्यांचा नाश होण्यास येवढेंसें देखील कारण पुरेसें आहे. काळाच्या जबर तडाख्यांत किती कागदपत्रांचा नाश झाला आहे, याची आपणांस कल्पना देखील करवत नाहीं ! कित्येक ठिकाणीं ते कसरीचे भक्षस्थानीं पडले असतील, तर दुसरे ठिकाणीं त्यांचीं मुलांनीं लिखितें करून टाकिलीं असतील, तर तिसरे ठिकाणीं त्यांचा रद्दीवजा उपयोग होऊन त्यांस वाण्यांचा व हलवायांचा आसरा घ्यावा लागला असेल, तर चवथे ठिकाणीं ते कोठारांतल्या कोठारांत कुजून गेले असतील, तर पांचवे ठिकाणीं निरूपयोगी कागदपत्र म्हणून त्यांचा चहा करण्याचे कामीं अगर पाणी तापवावयाचे कामीं उपयोग केला असेल, तर सहावे ठिकाणीं झुरळांनीं त्यांचा दप्तरांतल्या दप्तरांत चुराडा करून टाकिला असेल. असे एक कीं दोन ? नानातऱ्हेचे नाशाचे मार्ग आहेत ! या कागदपत्रांच्या भयंकर नाशामुळें मानवजातीच्या असंख्य काळाचा इतिहास आजला अगदीं नाहींसा झाला आहे. त्याला आपण पूर्णपणें आंचवलों आहोंत ! या कागदपत्रांच्या भयंकर नाशामुळे आपल्या इतिहासशास्त्राचें कधींही न भरून येणारें असें कल्पनातीत नुकसान झालें आहे ! हा विचार मनांत आला म्हणजे पराकाष्ठेचें दुःख होतें. निरूपायाची गोष्ट पडली म्हणून मनाचें कसें तरी समाधान करणें भाग आहे; व आणखी तरी जास्त नाश होऊं नये; एतदर्थ क्षणभरही विलंब न करितां आपणांस आपलें लक्ष तिकडे लावलें पाहिजे; कारण, जर कागदपत्र नाहींत, तर इतिहासही नाहीं.

यावरून कागदपत्र हे इतिहासाचे केवळ "प्राण" होत, अशी सर्वांची खात्री होईल. परंतु, हा इतिहासाचा प्राण आपण अमुक एक ठिकाणीं गेलों असता मिळणार आहे, असें थोडेच आहे ? एकाच ठिकाणीं कागदपत्र लिहून ठेविले आहेत असें नाही. ते जसे ज्याला वाटले तसे त्यानें आपल्या ठिकाणीं लिहून ठेविले आहेत. कांहीं संस्थानिकांच्या दप्तरांत आहेत, व कांहीं जुन्या घराण्यांच्या एखाद्या मोडक्या फडताळांत लोळत पडले आहेत ते सर्व देशभर पसरले आहेत. त्यांची आपणांस बिलकुल माहिती नाहीं, अशा स्थितींत जर आपण एखादें

ऐतिहासिक प्रकरण लिहावयास हातीं घेतलें तर त्या कागदपत्रांचा आपणांस काय उपयोग ! ते जेथल्या तथेंच. बरें, कांहीं जवळपास असलेले कागदपत्र आपण जमविले व त्यांवर आपला ग्रंथ रचिला तर तो संपूर्ण व निर्दोष होण्याचा संभव आहे काय ? कागदपत्र म्हणजे ब्रह्मवाक्य नव्हे. जेवढें त्यांस सांपडेल तेवढें सर्व खरें असावयाचें असा तर नियम नाहींना ! असें धरून चाललें म्हणजे जगामध्यें लोक कधीं खोटें बोलत नाहींत व कधीं खोटें लिहीत नाहीं, असें म्हणावयाचें धाडस करण्यासारखें आहे. तेव्हां, कागदपत्रांतील मजकूर 'प्रमाण' धरून कसें चालेल ! आपणांस त्यास शास्त्रीय पद्धतीच्या चर्चेच्या भट्टींतून तावून सुलाखून काढलें पाहिजे. त्यांचा हा संस्कार झाल्याशिवाय ते त्याज्य होत. आपणांस सत्यास नीट जपलें पाहिजे. कदाचित् असत्य सत्याचें पांघरूण घेऊन पुढें आलें असतां आपण फसले जाण्याचा फार संभव आहे. त्याचप्रमाणें आपणांस लिहावयाच्या प्रकरणासंबंधीं आधीं कागदपत्र आहेत किती व आहेत कोठें, याचा तपास केल्यावांचून कोणत्याही प्रकरणांस हात घालणें अविचाराचें होईल. अशा रीतीनें अपुरी माहिती मिळून ग्रंथ सदोष व अपूर्ण होण्याचा संभव आहे. याकरितां, आपणांस लागणाऱ्या असतील नसतील तेवढया कागदपत्रांची माहिती आपणांस अवश्य पाहिजे. पण जेव्हां कागदपत्र पसरले आहेत व कोठें आहेत याचा देखील पत्ता नाहीं, अशा स्थितींत इतिहास लिहिण्याचें किती जरी मनांत असलें, तरी त्याचा काय उपयोग ! म्हणून इतिहासशास्त्राची चाड बाळगिणाराचें पहिलें कर्तव्य, कागदपत्रांचा शोध करणें हें होय. हें इतिहास शास्त्रांतील आद्य आणि अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य होय. हें प्रथमतः केल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कामास आपणांस हात घालता येत नाहीं. तेव्हां, हा कागदपत्रांचा शोध कसा करावयाचा व त्यांचा संग्रह कसा करावयाचा याचा आपण विचार करूं.

आतां हा शोध करणें म्हणजे लहानसहान काम नव्हे. त्याला दोन्ही बळें अगदीं रगाडीचीं पाहिजेत. एक 'मनुष्यबळ' व दुसरें 'द्रव्यबळ.' ही दोन्हीं बळें चांगली भरपूर असल्यावांचून हें शोधाचें दांडग्या श्रमाचें व पैशाचें काम नीट निभावणें कठिण आहे. कागदपत्र जमविण्याकरितां हौसेनें कांहीं विद्वान् व शोधक पुढें आले तर तेवढ्यानेंच तें काम भागणार नाहीं. त्याला पगारी लोकांचीं जरूरी आहे. कारण, ह्या कामीं पुष्कळ लोक पाहिजे असल्याकारणानें केवळ हाताच्या बोटाइतक्या विद्वानांच्या व शोधकांच्या संख्येवर निर्वाह होणें शक्य नाहीं. तेव्हां, या कामी विद्वानांनीं व त्या देशाच्या सरकारनें एक होऊन या शोधाचें कामास आरंभ केल्यास तें काम सोपें व सोईस्कर होण्याचा संभव आहे.

जेथें कागदपत्र मिळण्याचा संभव असेल तेथें जाऊन अस्सल प्रत मिळाल्यास अस्सल, नक्कल मिळाल्यास नक्कल, फुकट अगर विकत मिळविली पाहिजे. कागदपत्र कोणाचे येथें सांपडतील व कोणाचे येथें सांपडणार नाहींत ह्याला कांहीं सामान्य नियम नाहीं. कांहीं पिढीजाद विद्वान् घराण्यांच्या घरीं त्यांचा चांगला संग्रह केला असेल तर कांहीं जुन्या पुजारी बोवांचे घरीं सुरक्षीत असतील, तर कांहीं इनामदारांच्या दप्तरांत व सरकारच्या दप्तरांत ते नीट लावून ठेवले असतील. तेव्हां, पहिलें काम हें कीं, पसरलेले खासगी कागदपत्र होतील तितके एके ठिकाणीं आणून ते सार्वजनिक करणें, हें होय.

आतां कांहीं अज्ञान व अप्रबुद्ध लोक शोधकांच्या बारीक नजरेपासून आपले कागदपत्र कसे लपवून ठेवीत असतात, याचा अनुभव सर्व देशांतल्या शोधकांस सारखा आलेला आहे. तो अनुभव हिंदुस्थानाला अगर महाराष्ट्रालाच आहे व युरोपला अगर इतर राष्ट्रांना नाहीं असें नाहीं. युरोपांत देखील प्रथमत: शोधाचें काम सुरू झालें त्या वेळेस लोक असेच – आमच्या इकडल्यासारखे – करीत असत; असें त्यांच्या शोधांचे इतिहास आपण वाचूं लागलों म्हणजे आपणांस आढळून येतें. तेव्हां, विद्वानांनीं लोकांचा वेडा समज व नसते कुतर्क घालवून त्यांस वस्तुस्थितीविषयीं खरें ज्ञान करून दिलें पाहिजे. असे केलें असतां तेच लोक उलट या कामीं आपणांस मदत करतील. इतिहासशास्त्राकरितां हा खटाटोप करावयाचा आहे; तो विद्वानांनाच फक्त हवा व बाकीच्यांना नको असें नाहीं. वास्तव सर्व लोकांनीं ह्या कामास – ह्या सत्यशोधनाचे पवित्र कामास – आपल्या शक्तीप्रमाणें हातभार लावणें उचित आहे.

सन १८६० चे सुमारास एक ब्यान क्रॉफ्ट म्हणून साहेब क्यालिफोर्नियांत आपल्या इतिहासाचीं साधनें जुळवीत होते. यासंबंधीं कांहीं माहिती एके ठिकाणीं आढळण्यांत आली; ती अशी :– ते श्रीमंत होते. त्यांना लागणारे छापील व हस्तलिखित कागदपत्र त्यांना मिळण्यासारखे होते ते सर्व झाडून बाजारांत खरेदी केले; ज्या कुटुंबांत त्यांना लागण्यासारखे कागदपत्र होते, तेथें ते त्यांनीं त्यांजपासून विकत घेतले व विकत न दिल्यास आपल्या आपल्या हस्तकांकडून मोठ्या मिनतवारीनें त्यांच्या नकला करून घेतल्या. हें सर्व झाल्यावर ते सर्व कागदपत्र ठेवण्याकरितां म्हणून मुद्दाम बांधलेल्या इमारतींत त्यांचे वर्गीकरण करून ते नीट ठेवून दिले. शास्त्रीय रीतीनें यापेक्षां अधिक सयुक्तिक पद्धति सांपडणें शक्य नाहीं. तेव्हां या सर्वमान्य शास्त्रीय पद्धतीचें अनुसरण करणें आपणांस श्रेयस्कर आहे.

अशा शास्त्रीय पद्धतीनें आपण सर्व कागदपत्र धुंडाळून काढिले म्हणजे ते

ठेवावयाचे कोठें, व त्यांचा इतिहासकारास उपयोग करितां यावा याकरितां काय काय तजविजी केल्या पाहिजेत, हा दुसरा प्रश्न आहे. हे कागदपत्र जमवून त्यांचा संग्रह करण्याकरितां मोठमोठीं संग्रहालयें स्थापिलीं पाहिजेत. तीं जंगी असून फार थोडीं असावींत. कारण एकेच ठिकाणीं पुष्कळ माहिती असली, म्हणजे इतिहासकारांस तें तितकें सोईस्कर व सुखाचें होतें. आतां, हे कागदपत्रांचे भारे आणून एका संग्रहालयांत टाकून दिले म्हणजे संपले असें कोणास वाटतें काय ? कोणास असें वाटत असल्यास तें त्याचे वाटणें चुकीचें आहे. कारण, अशा रीतीने नुसते एके ठिकाणीं सांठवून ठेवलेले कागदपत्र इतिहासकारांस फारसे उपयोगी पडणारे नाहींत. येवढेंच नव्हे, तर ते पसरलेल्या स्थितींत असतां इतिहासकाराची जी अवस्था तीच आतां एके ठिकाणीं जमविले असतांही होणार आहे. कारण इतिहासकारांस एखाद्या प्रकरणासंबंधानें लिहावयाचें असल्यास त्यासंबंधाने एकंदर कागदपत्र किती आहेत, कोठें आहेत व त्यांत काय आहे, ही माहिती कोणी त्यास तयार करून दिल्याशिवाय त्याचें चालणार नाहीं. तो एकटाच मनुष्य सर्व संग्रहालयाचा अपरंपार समुद्र धुंडून त्यांत बुड्या मारतां मारतां अगदीं टेंकीस येईल; व इष्ट गोष्टीची प्राप्ति त्यास सबंध आयुष्याचा व्यय करूनही व्हावयाची नाहीं. प्रत्येक कागद वाचा, त्यांत आपणास लागणारी माहिती जेथें सांपडेल ती गोळा करा. बरें येवढें करूनही भागणार आहे थोडेंच ? तिला पुन्हां खरें खोटें पाहाण्याकरितां चर्चेची कसोटी लावा व मग त्यांपासून इतिहासाचें विवक्षित प्रकरण लिहिण्यास उपयोगी माहिती मिळवून तिच्यावर ग्रंथरचनेची इमारत रचा ! इतक्या दगदगीचें व विलक्षण श्रमाचें काम एकाच माणसानें अंगावर घेणें अविचाराचें आहे. तें त्याला झेपणार नाहीं व अशा रीतीनें इतिहासशास्त्राची प्रगतीही फारच थोडी होण्याचा संभव आहे. या करितां, श्रमविभागाचें तत्त्व पाळणें अवश्य आहे. कागदपत्र जुळविण्यास जसे अनेक लोक योजावे लागतात, तसे कागदपत्र नीट वाचून इतिहासाच्या कोणत्या प्रकरणावर किती कागदपत्र आहेत, ते व्यवस्थित जुळवून ठेवण्याकरितां व त्यांच्या छापील यादी तयार करण्याकरितां विद्वान् व शोधक बुद्धीच्या लोकांची योजना करणें जरूर आहे. पण येवढ्यानेंच संपते असें नाहीं. नुसत्या कागदपत्रांची नांवनिशीवार यादी व त्यांची संख्या यांचा इतिहासकारांस तादृश उपयोग नाहीं. कारण, प्रत्येक कागदपत्र वाचून त्यांतील माहिती गोळा करून व तिची चर्चा करून मग ग्रंथरचना करावयाची, इतका त्याला वेळ आहे कोठें ! शिवाय नुसत्या याद्यांनीं कागदपत्र त्यास इतके उपयुक्त व सुगम होत नाहींत. म्हणून कागदपत्रांच्या यादींत प्रत्येक कागदपत्रापुढें त्यांतील माहितीचा

गोषवारा नमूद करणें जरूर आहे. त्याचप्रमाणें कागदपत्रांचीं सूचीपत्रें छापून प्रसिद्ध करणें अगत्याचें आहे. ह्या याद्या, सूचीपत्रें व गोषवारे होईल तितके विस्तृत व सुबोध करण्याविषयीं काळजी घेतली पाहिजे. यामुळें कागदपत्र जास्त उपयुक्त व सुगम असें होतात.

हें काम कमी श्रमाचें नव्हे; त्याचप्रमाणें, केवळ भाडोत्री लोकांवर हे महत्त्वाचे व बारकाईचें काम सोंपविणें साहसाचें होणार आहे. हें काम मनापासून व काळजीपूर्वक झालें पाहिजे. त्यांत ज्यांना आवड नाहीं अशा पगारी लोकांस घातल्यास ते हलगर्जीपणामुळें अगर आळसानें कुचराई करून सर्व कामाचा बिघाड करून टाकतील. ह्यास्तव, विद्वान् शोधकांनींच हें जबाबदारीचें व महत्त्वाचें काम आपल्या शिरावर घ्यावें, हें उत्तम. हीं संग्रहालयें सार्वजनिक असलीं पाहिजेत, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्यांवर सर्वांची सारखी मालकी पाहिजे; म्हणजे वाटेल त्यास माहिती हवी असल्यास तेथें हक्कानें जातां यावें व ती त्यास मिळवितां यावी.

या प्रमाणें कागदपत्र मोठ्या श्रमानें व खर्चानें शोधून काढून, त्यांचा संग्रह करून, त्यांच्या याद्या, सूचीपत्रें व गोषवारे उत्तम रीतीनें प्रसिद्ध झाले म्हणजे कागदपत्रासंबंधीं काम पुष्कळ आटोक्यांत आलें व तें पुष्कळ सुगम झालें असें म्हणण्यास कांहीं हरकत राहणार नाहीं. याच शास्त्रीय पद्धतीनें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि युरोपीय विद्यासंपन्न राष्ट्रांत कागदपत्रांचीं मोठमोठीं संग्रहालयें स्थापिलीं आहेत.

आतां, इतिहासाच्या निरनिराळ्या कालासंबंधीं कागदपत्रांच्या शोधांत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणी आहेत, म्हणून कोणत्याही काळासंबंधीं कागद-पत्रांचा शोध करण्याचें हातीं घेण्यापूर्वी या सर्व अडचणींचा विचार करणें जरूर आहे. तर आतां आपण तत्संबंधीं थोडेसें विवेचन करूं.

इतिहासाच्या कांहीं भागांवर अनेक ग्रंथ झाले आहेत; व त्यामुळें त्यांचे कागदपत्र भरपूर उजेडांत येऊन ते छापून त्यांची नीट व्यवस्था लागली आहे. आतां ह्याच इतिहासाच्या भागांसंबंधीं कोणा इतिहासकारास लिहिणें झाल्यास त्याला बसल्या जागीं सर्व सामुग्री मिळण्यासारखी आहे. त्यास कागदपत्र शोध-ण्यास त्रास व दगदग पडणार नाहीं. म्हणून कागदपत्रांच्या शोधाचें मान इतिहासाच्या ज्या कालासंबंधीं ते असतील त्यांच्या कमी जास्त विस्तारावर अवलंबून आहे. एखाद्या स्थानिक इतिहासासंबंधीं कागदपत्रांचा शोध करावयाचा

असल्यास त्यास स्थानिक शोध पुरेसा आहे. लांबलांबचे प्रवास, देशाटणें वगैरे अटाटींची तेथें जरूर नाहीं. एखाद्या इतिहासाचा भाग असा असतो कीं, तो लिहिण्यास फारशा कागदपत्रांची जरूरीच लागत नाहीं. जवळपास असलेल्या पण पुरेशा कागदपत्रांवर त्याचें काम चांगलें भागतें. त्याजकरितां उगीच जास्त कागदपत्रांचा शोध करणें निरर्थक होय. तेच दुसऱ्यापक्षीं प्राचीन काळच्या किंवा अर्वाचीन काळच्या पूर्वीचा एखादा लहानसा भाग लिहिण्याचें जरी मनांत आणलें, तरी सर्व युरोपभर संग्रहालयें धुंडाळीत फिरलें पाहिजे व डोंगराएवढे श्रम वर्षानुवर्षे करून उंदरायेवढी जी काय तुटपुंजी माहिती मिळेल तीवर त्या ग्रंथाची इमारत रचली पाहिजे. तेव्हां, सांगावयाचा सारांश हा कीं, आपण अर्वाचीन काळापासून जसजसे लांब जाऊं व जसजसा आपला इतिहास लिहिण्याचा टापु जास्त विस्तृत व विविध होत जाईल, तसतसा यातायातीचा वांटा शोधकांच्या पदरीं फलप्राप्तीच्या वांट्याच्या मानानें पुष्कळ अधिक येतो.

याकरितां अश्रांत श्रमाचें खत इतिहासाच्या कोणत्या शाखेच्या कामीं उपयोगांत आणावयाचे, हें ज्याचे त्यानें प्रथमच पूर्ण विचारानें व खोल बुद्धीनें ठरविलें पाहिजे. केवळ कांहीं तरी व कशावर तरी विनाकारण श्रम करावयाचे, असल्या अविचारानें एखादें काम अंगावर घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सांप्रतकाळीं कांहीं विषय असे आहेत कीं आपणांस सध्यां ठाऊक असलेल्या शोध करण्याच्या साधनांनीं त्यांची माहिती मिळणें असंभाव्य आहे. त्यांस जंगी शोध व सबंध आयुष्याचा व बुद्धीचा व्यय करूनही कांहींही लाभ होणें नाहीं. आतां आज ज्यांचा शोध करणें इतकें विफल व कठीण झालें आहे, तेंच उद्यां कदाचित् सफळ व सुगम होईल. पण तशी वेळ येईपर्यंत इतिहासाच्या असंख्य भागांपैकीं कोणत्या भागाचा शोध करण्यास साधनें अनुकूल आहेत व कोणत्या भागाची सामुग्री चांगली व अल्प श्रमानें मिळण्याचा सध्या संभव आहे, हें आपल्या मनाशीं पूर्ण विचारानें व खोल बुद्धीनें ठरवून, त्या कामास हात घालावा. त्याप्रमाणें आपणांस ज्या भागावर लिहावयाचें त्याला लागणाऱ्या कागदपत्रांचें काय स्वरूप आहे व त्यांचा किती विस्तार आहे याची माहिती नीट करून घेतल्या शिवाय, एखाद्या विषयास हात घालणें अयोग्य आहे. म्हणून त्याचा आधीं नीट विचार करावा; कारण अशीं पुष्कळ उदाहरणें घडलेलीं आहेत कीं कागदपत्रांच्या शोधाकरितां बिचारे वर्षानुवर्ष निरर्थक श्रम करून आपल्या आयुष्याचा व उमेदीचा व्यर्थ व्यय करीत होते. तेंच दुसऱ्या तऱ्हेचें एखादें इतिहास प्रकरण पूर्ण विचार करून त्यांनीं लिहिण्याचें मनावर घेतलें असतें तर त्यांच्या श्रमाचें चांगलें चीज झालें असतें.

हा उपदेश विशेषतः या शास्त्राचा व्यासंग करूं इच्छिणाऱ्या नवीन व अननुभविक उमेदवारांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

## ( ३ ) इतिहासकारास साहाय्यकारक ज्ञान :

कागदपत्रांचा शोध केल्यावर त्यांची चर्चा करण्याकरितां ज्याप्रमाणें निर्दोष विचारपद्धतीची जरूरी आहे, त्याप्रमाणें कांहीं गोष्टींचें ज्ञान असणें आवश्यक आहे. चर्चा करतांना विचारपद्धतीच्या दोषामुळें जशा चुकी होण्याचा संभव आहे, तशी अज्ञानापासूनही चूक होणें शक्य आहे. म्हणून इतिहासकाराच्या उद्योगाला अगदीं आवश्यक असें कोणकोणत्या गोष्टींचें ज्ञान असलें पाहिजे, याचा आतां विचार करूं.

मेक्लीसाहेब म्हणतात, सर्व गोष्टींचे आधीं इतिहासकारानें सृष्टिशास्त्र, कायदेशास्त्र, नीतिशास्त्र व राजनीतिशास्त्र इतक्या शास्त्रांचें अध्ययन केलेंच पाहिजे. दुसरे एक मोठे विद्वान शोधक व इतिहासाचा व्यासंग असलेले साहेब मि. डोनो म्हणून आहेत. ते इतिहासकाराला आवश्यक लागणाऱ्या ज्ञानाचे तीन वर्ग करतात : ( १ ) भाषाविषयक, ( २ ) तत्त्वज्ञानविषयक, ( ३ ) इतिहासविषयक. भाषाविषयकज्ञान म्हणजे काव्यें व कादंबऱ्या. कवींनीं कथनांची कला मूळ उत्पन्न केली, म्हणून त्या कलेचे चांगलें ज्ञान मिळविण्यासाठीं त्यांच्या उत्तम उत्तम काव्यांचा त्यानें चांगला अभ्यास केला पाहिजे. कादंबऱ्यांचें अध्ययन अशा करितां कीं, चित्रविचित्र व मोहक भाषेंत आपणांस इतिहास लिहितां यावा. कादंबऱ्यांचे वाचनापासून ग्रंथांतील पात्रांना मनोवेधकता व मोहकता कशी आणावी, झोंकदार भाषेनें निरनिराळे प्रसंग वाचकांच्या डोळ्यांपुढें उभे करून त्यांस तल्लीन कसें करावें, चतुराईनें कथासूत्र गुंफून वाचकांची जिज्ञासा सारखी जागृत कशी ठेवावी, व दुष्टतेबद्दल तिरस्कार, अन्यायाबद्दल संताप, सौजन्यासंबंधीं प्रेम, सद्गुणाविषयीं अभिमान, सत्याच्या उत्कर्षास्तव हर्ष व असत्याच्या उत्कर्षास्तव दुःख इत्यादि मनोवृत्ति प्रसंगानुरूप कशा क्षुब्ध करून सोडाव्यात, याचें त्यास चांगलें ज्ञान होतें. नंतर त्यानें चांगल्या चांगल्या इतिहासकारांचें ग्रंथ वाचले पाहिजेत. हिरॉडाटेस, थ्युसीडायडीज्, झेनॉफन्, पोलीबिअस आणि प्लुटार्क हे ग्रीक लोकांतील इतिहासकार, लिव्ही, टासीटस इत्यादि ल्याटिन इतिहासकार, व अर्वाचीन काळांतील म्याकिव्हेली, ह्यूम, गिबन इत्यादि नांवाजलेले प्रसिद्ध इतिहासकार या सर्वांचें ग्रंथ त्यानें लक्षपूर्वक वाचले पाहिजेत. त्यामुळें त्याला निरनिराळ्या भाषाशैलीची माहिती होऊन त्यांचा

आपल्या ग्रंथांतून उपयोग करण्यास त्यास ठीक पडेल. तत्त्वज्ञानविषयक ग्रंथासंबंधीं त्यानें सिसेरो, अरिस्टॉटल इत्यादि तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथाचें पठण करावें. याशिवाय आजपर्यंत प्रसिद्ध झालेलें सर्व ऐतिहासिक ज्ञान त्यास अवगत असलें पाहिजे. कारण, त्यामुळें लोकांना या ज्ञानाच्या कोणत्या भागासंबंधीं माहिती मिळाली आहे व काय मिळावयाची राहिली आहे, हें त्यास नीटपणें समजेल. यास्तव, भाषापद्धति उचलण्याकरितां म्हणून एकदा वाचलेलें ऐतिहासिक ग्रंथ दुसऱ्या वेळेस, त्यांतील ऐतिहासिक गोष्टींचें ज्ञान लक्षपूर्वक मिळवून कधींही न पुसेल अशा रीतीनें मननपूर्वक तें आपल्या स्मृतिपटलावर इतिहासकारानें कोरून ठेवण्याकरितां पुन्हां वाचले पाहिजेत.

कोणी म्हणतात, इतिहासकारास काय यावयास नको ? सर्व कांहीं आलें पाहिजे. त्याच्या अंमलाखालीं येणारा प्रांत, कांहीं लहानसा तुकडा नव्हे, त्यांत कराल तेवढ्या गोष्टींचा समावेश होणार आहे; अशी त्याची विषयभूमी अवाढव्य आहे. फ्रीमन साहेब म्हणतात, इतिहासकारास तत्त्वज्ञान आलें पाहिजे, कायदेशास्त्राची माहिती पाहिजे, आंकडेशास्त्र पाहिजे, भूगोल पाहिजे, खगोल पाहिजे, अर्थशास्त्र पाहिजे, राजकीयशास्त्र पाहिजे, गणित पाहिजे. ज्योतिष पाहिजे, काव्य पाहिजे, सारांश, काय नको ? त्याला इतिहास लिहितांना या सर्व गोष्टी भेटणारच; व त्यांची जेथल्या तेथें त्यांच्या योग्यतेनुरूप संभावना करणें हें त्याचें कर्तव्य होय. फ्रीमन साहेब आणखी असें म्हणतात कीं, इतिहास लिहितांना कोणते विषय भेटतील आणि कोणते नाहीं. याचा कांहीं नियम नाहीं. यास्तव, ज्ञानवृक्षाच्या जेवढ्या शाखांवर आरोहण करून आंदोलन करण्याचें त्याचें सामर्थ्य असेल तितका तो आपल्या कामास जास्त लायक होतो. भूगर्भशास्त्राचा इतिहासशास्त्राशीं जितका संबंध आहे तितका इतर शास्त्राशीं नाहीं. याकरितां या शास्त्राचा इतिहासकाराला चांगलाच अभ्यास केला पाहिजे. आणि रसायनशास्त्राचा तरी कां नको ? त्याचाही संबंध इतिहासांत येणारच. तेव्हां याचें देखील अध्ययन त्यानें केलें पाहिजे.

मागे सांगितलेले डोनो साहेब देखील अगदीं त्याचप्रमाणें म्हणतात, पण त्यांच्या म्हणण्याचा शेवट जरा निराळा आहे. डोनो साहेब आणखी म्हणतात, "इतिहासकाराचा टापू अतिशय विस्तृत व विविध असल्याकारणानें त्याला असेल तितक्या गोष्टींचें ज्ञान थोडेंच होणार आहे ! पुष्कळवेळां अनेक भाषांचे ज्ञान व रसायन व गणित शास्त्रांची देखील त्यास चांगली माहिती असणें जरूर पडतें." "तरी" शेवटीं ते म्हणतात "इतिहास लिहिणाराला या सर्व विषयांचें

चांगल्या सुशिक्षित विद्वान माणसाला जितकें ज्ञान असतें, तितकें म्हणजे सामान्य ज्ञान असलें म्हणजे पुरेसें आहे."

इतिहासकाराच्या वास्तव स्वरूपासंबंधीं चांगले विद्वान् लोक देखील कसे चकले आहेत, याचा मासला इतका वेळ दाखविला. अशा रीतीनें ग्रंथकारांनीं या व अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या इतिहास विषयक प्रश्नांवर शाईचे पूर वाहविले आहेत; व या निष्फळ वादांत अंगांतल्या रक्ताचे समुद्राचे समुद्र आटविले आहेत व आमच्या मतें, पद्धतशीर इतिहास लिहिण्यासाठीं आधीं इतिहासशास्त्राच्या मूलतत्त्वांचा अभ्यास इतिहासकारानें केला पाहिजे. शिवाय, एखादा भाषापंडित म्हणजे इतिहासकार अशी आमची मुळींच कल्पना नाहीं. नीतिशास्त्राचा उपदेश करणाऱ्याला आम्ही इतिहासकार समजत नाहीं, अगर कादंबरीच्या थाटावर आपल्या इतिहासाची मोहक रचना करणाऱ्याला आम्ही इतिहासकार म्हणून ओळखीत नाहीं. नीतिशास्त्रावर व्याख्यानें झोडणें इतिहासकाराचें काम नव्हें, किंवा धर्मशास्त्रदृष्ट्या, अजिंक्य बाजीराव साहेबांनीं यवनी स्त्रीशीं केलेला संबंध कोणत्या पापांत मोडतो व त्याबद्दल त्यांस प्रायश्चित काय याविषयीं विवेचन करून बाजीराव साहेबास वाळींत टाकावयाचें किंवा क्षौरावरच मोकळें सोडावयाचे, हें ठरविण्याचें काम इतिहासकाराचें नसून धर्मशास्त्रकारांचे आहे. **तर जो शास्त्रीय पद्धतीनें कागदपत्रांतील माहितीचें परिक्षण करून खऱ्या बुद्धीनें खरा इतिहास लिहितो तोच खरा इतिहासकार होय.**

आपल्यापुढें एक कागद आहे; आणि जर तो आपणास वाचतां येत नाहीं, तर त्याचा आपणांस काय उपयोग ? म्हणून ज्या इतिहासकाराला मूळ कागदपत्रांपासून शोधक बुद्धीनें खरा इतिहास लिहावयाचा असेल त्याला त्याच्या इतिहासास लागणारे कागदपत्र ज्या भाषेंत असतील तिचें चांगलें ज्ञान असणें अवश्य आहे. ज्या काळचा इतिहास लिहावयाचा असेल त्या काळचे कागदपत्र ज्या भाषेंत असतील ती भाषा चांगली येणें हेंच – एवढेंच इतिहासकारास, वास्तविक म्हणावयाचे म्हणजे इतिहासाच्या शोधास–आवश्यक लागणारे साह्यकारक ज्ञान होय. आर्य लोकांचा इतिहास लिहावयाचा असल्यास संस्कृत, ग्रीक लोकांचा इतिहास लिहावयाचा असल्यास ग्रीक, फारशांचा असल्यास फारशी, या भाषांच्या प्राचीन स्वरूपाचें – अर्वाचीन स्वरूपाचें नव्हें – चांगलें ज्ञान असणें जरूरीचे आहे. येथें 'अर्वाचीन नव्हे' असा स्पष्ट उल्लेख करण्याचें कारण, भाषा ही सारखी बदलत असते; व आर्वाचीन काळच्या तिच्या स्वरूपावरून तींतील प्राचीन लेखांचा अर्थ केल्यामुळें अर्थाचे अनर्थ केलेले पुष्कळ दाखले आपणांस आलेले

आहेत. याकरितां ज्या काळचे कागदपत्र असतील त्या काळच्या भाषेचें विशिष्ट ज्ञान असलें पाहिजे. एखाद्या काळचा इतिहास लिहिण्याला अनेक भाषांचें ज्ञान लागणें संभवनीय आहे. अर्वाचीन किंवा समकालीन काळासंबंधीं लिहावयाचें झाल्यास, त्यास किंवा त्याचे शोधास साह्यकारक ज्ञान थोडें आहे, तेंच प्राचीन काळाकडे वळलें म्हणजे कठीण व विविध आहे. अशा रीतीची—इतिहासकाराच्या ऐतिहासिक शोधाला—आवश्यक लागणाऱ्या साह्यकारक ज्ञानाची स्थिति आहे.

परंतु ह्याला देखील सामान्य नियम असा कांहींच ठरवितां येणार नाहीं. ऐतिहासिक शोध करणारांनीं अमक्या भाषा शिकल्या पाहिजेत, किंवा त्यानें अमुक एक ज्ञान संपादन केलें पाहिजें, असा सरसकट एकच नियम करितां येणें अशक्य आहे. जर इतिहासकाराला विद्वान् शोधकानें कागदपत्रांतील माहिती जुळवून, शोधून व चर्चा करून अगदीं तयार करून ठेविली असेल, तर मग इतिहासकारास शोधाचे भानगडींत पडावयास नको व तत्संबंधीं ज्ञानही नको. इतिहास शास्त्रीय रीतीनें लिहावयाचा झाला तर निर्दोष विचारपद्धति व सामान्य शिक्षण यापेक्षां रतिभरही जास्त ज्ञानाची, माहितीची किंवा शास्त्राची उठाठेव त्यास करावयास नको, असें आमचें मत आहे. त्याला अठरापगड भाषांचें ज्ञान काय करावयाचें आहे ? पारशी लोकांचा इतिहास लिहावयास संस्कृत भाषेचें ज्ञान काय करावयाचें आहे ? त्याचप्रमाणें, प्राचीन आर्यांचा इतिहास लिहावयास अर्वाचीन इतिहासावरील भाराभर ग्रंथांच्या अध्ययनाचा काय उपयोग ? भूगर्भशास्त्र त्याला काय करावयाचें आहे ? व नीतिशास्त्राच्या अभ्यासाचा त्याला काय उपयोग ? यासंबंधीं विचार करावयाला त्या त्या शास्त्रावरील विद्वान् आहेतच इतिहासकाराला कायदेशास्त्र नको आहे; किंवा आंकडेशास्त्र शिकण्याची त्याला फारशी जरूरी नाहीं. त्यास खगोलशास्त्रवेत्ता बनणें नको किंवा रसायनशास्त्राची उठाठेव करावयास नको. त्याला या गोष्टींचा विचार करून करावयाचें आहे काय ? त्या त्या शास्त्रावरील विद्वान् त्यांचा पृथकपणें विचार करण्यास खंबीर आहेत; ते इतिहासकाराचें काम नव्हे. त्याचें काम म्हटलें म्हणजे शास्त्रीय पद्धतीनें कागदपत्राचें परीक्षण करून खऱ्या ऐतिहासिक गोष्टी तावून सुलाखून स्पष्टपणें लोकांपुढें मांडावयाच्या. तो लिहित असलेल्या काळांत निरनिराळ्या शास्त्रासंबंधीं खरी व शुद्ध माहिती मिळेल, ती त्या त्या शास्त्रज्ञांच्या पदरांत टाकावयाची एवढ्याच पुरता त्याचा त्या शास्त्राशीं संबंध. या पलीकडे त्याचें त्यासंबंधीं कांहीं एक कर्तव्य नाहीं. सत्याचा शोध व सत्याचें कथन हें इतिहासकाराचें पवित्र काम आहे. आणि जर तो आपलें कर्तव्य व प्रांत विसरून दुसऱ्या

शास्त्राचे उद्योगांत हात घालूं लागला व दुसऱ्या प्रातांत शिरून आगंतुकी करूं लागला, तर दोषी होतो. सत्यशोधनाचें पवित्र काम विसरून जर तो नीतिशास्त्रज्ञांचे आसनावर बसून नीतिशास्त्रावर व्याख्यानें झोडूं लागला तर त्यास बिनदिक्कत वाटेल त्यानें न्यायदेवतेच्या मंदिरांत घेऊन जाऊन आरोपीच्या पिंजऱ्यांत नेऊन उभें करावें. असो, सारांश इतिहासकाराला अवश्यक लागणारें ज्ञान फार फार झालें तर डोनोसाहेबांनीं शेवटीं सांगितल्याप्रमाणें चांगल्या सुशिक्षित विद्वानाइतकें असलें म्हणजे डोक्यावरून पाणी गेलें. बाकी त्याला सामान्य शिक्षण व इतिहास लिहिण्यास लागणारें कागदपत्र समजण्याइतकें ज्ञान असलें म्हणजे झाल.

## ( ४ ) ऐतिहासिक ज्ञानाचें सामान्य स्वरूप

कोणतीही गोष्ट समजण्याचे दोन मार्ग आहेत. एक प्रत्यक्ष रीतीनें व दुसरा अप्रत्यक्ष रीतीनें. उदाहरणार्थ आपण धरणीकंप घेऊं; प्रत्यक्ष धरणीकंप होत असतां मला जी त्याची माहिती मिळते, ती प्रत्यक्ष होय, व तीच माहिती धरणीकंप होऊन गेल्यावर त्याच्यामुळें झालेल्या मोडतोडीपासून किंवा नासाडीपासून जी माहिती मला मिळते, किंवा पुष्कळ वर्षांनंतर सर्व नासाडीचा परिणाम बुजून गेल्यानंतर त्याचें एखाद्या पुस्तकांत वर्णन वाचून जी माहिती मला मिळते ती अप्रत्यक्ष होय. इतिहासशास्त्र हें प्रत्यक्ष अवलोकनाचें शास्त्र नव्हे. त्याला प्रत्यक्ष ज्ञानाचें शास्त्र म्हणतां येणार नाहीं. हेच या शास्त्रांतील विशेष आहे. भूगर्भ शास्त्राशिवाय इतर सर्व शास्त्रें प्रत्यक्ष अवलोकनाचीं म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानाचीं शास्त्रें होत. त्यांतील गोष्टीची सत्यता आपणांस वाटेल त्या वेळेस प्रत्यक्ष प्रयोगावरून कसोटीस लावून पाहातां येते. परंतु इतिहासशास्त्राचें तसें नाहीं. त्याचें ज्ञान केवळ अप्रत्यक्ष रीतीनें म्हणजे कागदपत्र वगैरेंच्या साहाय्यानें व्हावयाचें. अमका एक प्रयोग करून रसायनशास्त्रांतील अमक्या एका गोष्टीच्या खरेपणाविषयींची प्रचिती पहा, असें जसें आपणांस म्हणतां येईल, तसें इतिहास शास्त्रासंबंधीं आपणांस म्हणतां येणार नाहीं. अमुक एक प्रयोग करून पानिपतच्या लढ्यांचें प्रत्यक्ष ज्ञान होईल असें कधीं तरी घडेल काय ? त्याला कागदपत्रांवरच अवलंबून राहिलें पाहिजे. त्यावांचून गत्यंतरच नाहीं. यामुळें अर्थातच या शास्त्राच्या व दुसऱ्या प्रत्यक्ष ज्ञानाच्या शास्त्राच्या पद्धती एकमेकांपासून भिन्न असणें स्वाभाविक आहे.

आतां कागदपत्रांपासून त्यांत लिहिलेल्या ऐतिहासिक गोष्टींविषयीं अनुमानें काढावयाची व निर्णय करावयाचा तो फार जपून व अतिशय सावधगिरीनें केला

पाहिजे. कागदपत्र हातांत पडल्यावर मूळ ऐतिहासिक गोष्टीजवळ जाऊन पोहोंचेपर्यंत सर्व कामें इतिहासकाराच्या तर्कशक्तीचीं आहेत. त्यांतील मजकुराचें पृथक्करण करून तत्संबंधी चर्चा करणें हाच या पद्धतीचा हेतु होय.

एखादा कागद पाहिल्याबरोबर पूर्वी ज्या स्थितींत तो होता त्याच स्थितींत तो आज आहे कीं काय, किंवा त्यांत फेरफार झाला आहे, अथवा त्याचें रूपांतर झालें आहे, व तसें झालें असल्यास त्याचें मूळ काय, इत्यादि प्रश्न साहजिकपणें मनामध्यें उभे राहातात. याविषयीं जी चर्चा करावयाची ती ' बाह्य चर्चा ' होय. नंतर ' आंतील चर्चा ' येते. एखादी ऐतिहासिक गोष्ट कळून ती लिहून संपवीपर्यंत लेखकाच्या मनाची काय काय स्थित्यंतरें झालीं, तो कागदपत्रांत काय म्हणतो, त्याचा लिहिण्याचा मतलब काय असावा, त्यानें लिहिलें आहे तें खरें लिहिलें आहे कीं काय, त्याच्या समजुती बरोबर होत्या किंवा नाहीं, इत्यादि गोष्टींचा या दुसऱ्या भागांत–आंतील चर्चेंत–समावेश होतो.

दुसऱ्या शास्त्रज्ञांशीं तुलना करून पाहातां इतिहासशास्त्रज्ञाची फारच वाईट स्थिति आहे. रसायनशास्त्रज्ञाप्रमाणें त्याला प्रत्यक्ष अवलोकन करितां येत नाहीं, येवढेंच नव्हे तर कागदपत्रांतील माहिती पुष्कळ वेळां चुकीची किंवा बनावट आणि अपुरी असते. एखाद्या रसायनशास्त्रज्ञाला त्याच्या साहाय्यकारी चाकरा-पासून त्याच्या प्रयोगाविषयीं अपुर्ती व तुटपुंजी माहिती मिळावी, त्याप्रमाणें इतिहासशास्त्रज्ञाची स्थिति आहे. त्याला जे कांहीं अपुरे, वाटेल तसे लिहिलेले कागदपत्राचे तुकडे सांपडतील, त्यांचा उपयोग करणें भाग आहे. म्हणून ह्या कागदपत्रांचा उपयोग करतांना इतिहासकारास फार खबरदारी घ्यावी लागते. खोटी माहिती टाकून व खऱ्या तेवढ्या गोष्टी निवडून काढून त्यास त्या सामग्रीचा उपयोग आपल्या शास्त्ररचनेच्या कामीं करावा लागतो.

येथें एक मनुष्य स्वभावाचा विशेष लक्षांत घेणें अवश्य आहे. तो हा कीं, साधारणपणें मनुष्याचें मन चर्चेला प्रतिकूळ असतें. जरी प्रत्येकजण येवढें कबूल करतो कीं चर्चा करण्याची पद्धत चांगली; चर्चा करावी, तरी पण स्वतः वागतांना फार करून कोणी तसें वागत नाहीं. पुष्कळ इतिहास लिहिणारांनीं कागदपत्रांचीं कांहींही चर्चा न करतां जी माहिती मिळाली ती डोळे झांकून आपल्या ग्रंथांतून दडपलेली आहे. मनुष्याचा मनोधर्मच असा आहे कीं, जी माहिती मिळेल तिला मान डोलवावयाची. तिचा निषेध न करतां तिचें जसेंच्या तसें ग्रहण करावयाचें. मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति चर्चेला प्रतिकूळ आहे. आपणांस रोजच्या

रोज या गोष्टीचा अनुभव येत नाहीं काय! किती एक गटारयंत्रांवर तयार होणाऱ्या बातम्या, नुकतेच घडलेलें काशीच्या पत्रिकेसारखें निनांवी व रिकाम-टेकड्या लोकांचें निराधार व फसवणुकीचें लेख इत्यादि गोष्टींवर त्यांच्या खरेपणाचा तल्लास न काढतां लाखों लोक खुशाल विश्वास ठेवितात, हें आपण पहात नाहीं काय? कांहीं तरी विशेष कारण असल्याशिवाय आपण मुद्दाम उठून कोणत्याही गोष्टीचा शोध व चर्चा करण्याचें भानगडींत पडत नाहीं. नाहीं तर जोपर्यंत एखाद्या गोष्टींत अतिशय असंभवनीयता नाहीं, जोपर्यंत ती खोटी आहे असें कोणी सिद्ध केले नाहीं, तोपर्यंत आपण तिच्यावर खुशाल विश्वास ठेवितो, तिचा चहूंकडे प्रसार करतों; आणि येवढेंच करून राहत नाहीं तर जरूर असल्यास तिचा आपल्या कामीं उपयोगही करतों. कोणाही मोकळ्या मनाच्या मनुष्यास हें कबूल करणें भाग आहे कीं मनाची ही सुस्ती-चर्चा करण्याविषयीं त्याचीं ही अननुकूलता-झाडून टाकण्यास फार श्रम पडतात. चर्चा न करितां चटकन कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवायचा, ही जी मनाची स्वाभाविक प्रवृत्ति तिचा बीमोड करण्यास सारखे श्रम केलें पाहिजेत व ते करतांना होणारे दुःखही थोडेसें अनुभविलें पाहिजे.

पाण्यामध्यें गेल्यावर मनुष्याची साहजिक प्रवृत्ति ज्या योगानें तो बुडेल अशा रीतीनें हालचाल करण्याकडे असते. पोहावयास शिकणें म्हणजे ती हालचाल करण्याची प्रवृत्ति दाबून ठेवून तिच्या बदली दुसऱ्या रीतीची हालचाल करण्यास शिकणें होय. त्याचप्रमाणें चर्चाही मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति नव्हे. ती आपणामध्यें आणली पाहिजे. आणि ती अगदीं आपलीशीं होण्याला—ती आपली प्रवृत्ति बनण्यास—अखंड संवय हाच एक उपाय आहे.

तर मग ऐतिहासिक विषयाचा प्रांत हा सर्वस्वी चर्चेचा प्रांत आहे, हें सिद्ध झालें. जर त्यांत सावधगिरीनें शिरलें नाहीं तर मनुष्याची साहजिकच प्रवृत्ति त्यास बुडविण्यास कमी करणार नाहीं. या करितां प्रत्येकानें आपल्या मनाचा हा सुस्तपणा घालवून, संवयीनें मनाची सर्वस्वी चर्चेकडे प्रवृत्ति करून घ्यावी. प्रत्येक मनुष्यानें इतिहासशास्त्राच्या मूलतत्त्वांची माहिती करून घेऊन, हळुहळु उपपत्तीचें पृथक्करण करण्याच्या क्रियेशीं आपला परिचय करून घेणें इष्ट आहे.

इतर शास्त्रांप्रमाणें इतिहासशास्त्रांतही दुर्लक्षापासून होणाऱ्या चुका घडणारच. पण यांत मनाच्या घोटाळ्यामुळें अपुरें पृथक्करण व सदोष विचारपद्धति उत्पन्न होऊन त्यामुळें चुक्या होण्याचा जास्त संभव आहे. प्रत्येक विधानाचें जर इतिहासकार पृथक्करण करतील तर पुराव्यावांचून फारच थोडीं विधानें ते आपल्या

ग्रंथांतून नमूद करतील. जर तर्कशास्त्रदृष्ट्या ते आपलीं कारणें व्यवस्थित लावतील, तर त्यांच्या ग्रंथांतून आभासांच्या पुष्कळ चुक्या कमी होतील.

(५) बाह्यचर्चा-खुद्द कागदपत्रांसंबंधीं चर्चा

आपल्या वेळच्या एखाद्या ग्रंथकारानें एक ग्रंथ लिहिला आहे असें आपण समजूं. तो आपली हस्तलिखित प्रत छापखानेंवाल्याकडे पाठवितो, आपल्या हातानें मुद्रिकें (प्रुफें) तपासून त्यावर 'छापा' अशी निशाणी मारतो. आणि अशा स्थितींत तो ग्रंथ छापून आपल्या हातांत येतो. कागदपत्रांची उत्तम स्थिति जिला म्हणतां येईल ती ही होय. या ग्रंथाचा कोणीहि कर्ता असो आणि त्यांचे कांहींही विचार असोत, परंतु आपणांस येवढें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, आपणांपुढें असलेला ग्रंथ त्याच्या हस्तलिखित प्रतीची 'साधारण बरोबर' प्रतिमा आहे. साधारण बरोबर म्हणण्याचें कारण, जर कर्त्यानें मुद्रितें (प्रुफें) वाईट रीतीनें तपासलीं असतील अथवा जर छापणारांनीं त्यानें केलेल्या दुरुस्तीकडे लक्ष दिलें नसेल तर इतक्या चांगल्या स्थितींत देखील मूळ प्रतीची ही प्रतिमा अपूर्ण व सदोष निघण्याचा संभव आहे. छापणारे कर्त्याच्या कधीं ध्यानींही आलें नसेल असें पुष्कळ वेळां छापतात आणि तें छापलेलें मग त्या बिचाऱ्याचे फारच उशीरानें लक्षांत येतें!

कधीं कधीं ग्रंथकार मेलेला आहे व त्याचा ग्रंथ छापविणेचा आहे असा प्रसंग येतो. अशा स्थितींत त्यानें लिहिलेली हस्तलिखित प्रत छापखानेवाल्याकडे पाठवितां येत नाहीं. मग, त्याची नक्कल करून एक प्रत छापखान्यांत पाठवावयाची. त्या प्रतीवरून ठसे जुळविणारांनीं ठसे जुळवून मुद्रिकें (प्रुफें) तयार करावयाचीं. हें करणें म्हणजे त्या प्रतीची पुन्हां तिसरी प्रत करण्याप्रमाणेंच होतें. नंतर त्या कर्त्याच्या जागीं ज्यानें तें काम त्याजकरितां अंगावर घेतलें, त्यानें ही तिसरी प्रत पहिल्या प्रतीशीं किंवा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे मूळ ग्रंथकाराच्या प्रतीशीं, ताडून पहावयाची व त्यांत कमी जास्त दुरुस्ती करावयाची; अशा रीतीनें हा ग्रंथ छापून तयार होतो. हा ज्या स्थितींत छापून तयार झाला, ती स्थिति प्रथमत: सांगितलेल्या सर्वस्वी अनुकूल स्थितीहून पुष्कळ गौण आहे. तेव्हां अर्थातच यांत चुका होण्याचा तितका जास्त संभव आहे. एखादे वेळेस कर्त्याचें हस्तलिखित समजण्याला फार जड जातें. त्याचें अक्षर लागत नाहीं. यामुळें पुष्कळवेळां अशा स्थितींत अक्षरांच्या व विराम चिन्हांच्या फार चुक्या होतात. एखाद्या मोठ्या ग्रंथकाराचा पत्रव्यवहार होतो त्यांत या मासल्याच्या चुका बऱ्याच दृष्टीस पडण्याचा

आतां आपण प्राचीन कागदपत्रांकडे वळूं. सांप्रत ते कोणत्या अवस्थेंत आहेत बरें? बहुतेक पुष्कळ स्थितींत मूळ प्रती हरवल्या आहेत व आपणांस प्रतीच्या प्रती मात्र सांपडल्या आहेत. त्या प्रती तरी मूळ प्रतीपासून घेतल्या आहेत काय? छे! त्या प्रतीच्या प्रती आहेत! बरें त्या प्रती करून घेणारांनी लिहून घेतांना मोठी काळजी घेतली किंवा मोठ्या विचारपूर्वक तिची प्रत करून घेतली, असेंही नाहीं. त्यानीं कसें तरी उतरून घेतलें. समजलें नाहीं किंवा लागलें नाहीं तेथें आपल्या पदरचें घातलें.

जर आपलीं छापील पुस्तकें कर्त्याच्या व छापणारांच्या एकसारख्या नजरे खालून छापून निघालीं असतांही सदोष व अपूर्ण छापलीं जातात. तर शतकेच्या शतकें प्रती करून दर वेळेस नवीन नवीन चुका होण्याचा जास्त संभव, अशा स्थितींत आपल्या हातांत आलेले कागदपत्र किती तऱ्हेच्या दोषांनीं भरलेले असतील बरें? ह्या गोष्टींचा ज्याचा त्यानें आपल्या मनाशीं घटकाभर विचार करावा, म्हणजे त्याची सहज खात्री होईल.

म्हणून कोणताही कागदपत्र उपयोगांत आणण्यापूर्वी त्यांतील मजकुराच्या खरेपणाविषयीं व यथार्थत्वाविषयीं खात्री करून घेणें अवश्य आहे. त्याची मूळ प्रत शोधून काढून तिच्याशीं ती ताडून पाहिली पाहिजे. कारण अशी पुष्कळ उदाहरणें आहेत कीं, सदोष प्रतींवर अनुमानांची इमारत रचल्यावर, खरी व दोषरहित मूळ प्रत उघडकीस आल्याबरोबर ती सबंध इमारतच्या इमारत ढांसळलेली आहे. तेव्हां आपण कागदपत्रांचे दोन चार प्रकार लक्षांत घेऊन त्यासंबंधीं विचार करूं.

(१) कर्त्याची हस्तलिखित प्रत सांपडली आहे, हें सर्वांत सोपें काम आहे. ती पूर्ण विश्वासानें छापून प्रसिद्ध करावयाची.

(२) मूळ प्रत हरवली आहे; व एकच प्रत उपलब्ध आहे. येथें फार सावधगिरी राखिली पाहिजे. कारण ती सदोष चुकीची किंवा अपूर्ण असण्याचा संभव आहे.

प्रती करतांना ज्या चुक्या होतात, त्यांतील कांहीं चुका ठरीव नियमांनीं होत असतात. ते नियम विद्वद्रत्नांनीं ठरवून टाकले आहेत. त्या नियमांनीं, जेथें मजकूर समजण्यासारखा नसेल, अर्थात सदोष असेल तेथें, आपण तर्क चालवून चुकी दुरूस्त करावयाची.

कित्येक अप्रबुद्ध प्रती करणारांना मूळ कर्त्याचे शब्द न समजल्यामुळें ते तेथें आपल्या पदरचे शब्द घालीत असतात. ते चटकन् उमगतात. तेथें दुरुस्ती करणें विद्वान् मनुष्यास फारसें कठीण नाहीं. कांहीं शब्द गाळणें अक्षरें खाणें, कांहीं शब्दांची पुनरुक्ति होणें, वाक्यांची विसंगता असणें इत्यादि चुका मोठ्याशा नाहींत, त्या अगदीं साध्या, त्याचप्रमाणें नेहमीं घडणाऱ्या असून त्यांची दुरुस्तीही चटकन् व फार श्रम न करितां करतां येते. परंतु लबाडीनें, जाणूनबुजून मुळांतील मजकूर गाळून त्याचे बदली नवीन घालणें, हा दोष मात्र फार भयंकर व सत्यास अपायकारक आहे. हा दोष बहुशा उघडकीस येत नाहीं व आलाच तर त्याची दुरुस्ती करणें कठीण असते. येथें चर्चा करुन, विद्वानांनीं जेथवर मती पोहोंचेल, तेथवर ती त्यानें देणें रास्त आहे. येथें विचारपद्धतीनें काय चूक आहे व खरा प्रकार कसा असावा हें तर्कशर्कानें व खोल बुद्धीनें ठरवून लोकांपुढें मांडावयाचें. या पलिकडे अशा स्थितींत जास्त कांहीं करणें शक्य नाहीं.

( ३ ) अनेक प्रती सांपडल्या आहेत; त्या एकमेकांपासून कमीजास्त मानानें भिन्न आहेत, आणि त्यांची मूळ प्रत हरवली आहे. ही स्थिति पुष्कळ प्रकारांनीं फायदेशीर आहे. तेथें त्या प्रतींचें शास्त्रीय पद्धतीनें विवेचन करून पृथक्करण करून व त्यांची एकमेकांशीं तुलना करुन सत्यप्राप्ती करून घेण्याला पुष्कळ जागा आहे. प्रथमतः या निरनिराळ्या प्रतींचा एकमेकांशीं काय व कसा संबंध आहे हें नीटपणें ठरविलें पाहिजे. ह्या सर्व एकाच हरवलेल्या प्रतीपासून आल्या आहेत कीं काय, याचा आधीं निर्णय केला पाहिजे; किंवा यांचीं निरनिराळीं मूल्यस्थानें आहेत ! असें असेल तर तितकें चांगलेंच होणार आहे.

येथें प्रथमतः दोन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. एक ही कीं, जर आपणांजवळ निरनिराळ्या आठ प्रती आहेत, तर पांच प्रती एक गोष्ट म्हणतात व तीन एक म्हणतात, म्हणून बहुमतानें निवाडा करणें न्याय होणार नाहीं. कारण चारी प्रती जर त्यांतील एका पांचव्या 'अ' प्रतीपासून उतरून घेतल्या असतील, तर ती एकच प्रत 'अ' एक गोष्ट सांगते असें झालें. म्हणजे जी गोष्ट बहुमतानें खरी ठरू पहात होती, ती थोडक्याशा विचाराअंतीं पार ढांसळून तिचें महत्त्व जाऊन ती खोटी ठरण्याच्या लागास आली. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं या पांचापैकीं जीं जास्त जुनी ती जास्त विश्वसनीय व अर्वाचीन तेवढ्या सदोष, असेंही म्हणतां येणार नाहीं. कारण, जी जुनी म्हणून आपण मोठी निर्दोष ठरवून महत्त्वाची मानतों, ती कदाचित् अर्वाचीन प्रतीपेक्षां जास्त निष्काळजीनें व दुर्लक्ष करून लिहिलेली असल्यास दोषपूर्ण असणें साहजिक

आहे. दुसरेही अनेक किरकोळ विचार आहेत, पण त्या सर्वांचा येथें विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं.

अनेक प्रतींच्या स्थितींत तुलनेसारखे निवाडा करण्याला उत्तम साधन नाहीं. तुलना करून पाहतां, जर सर्व प्रतींचें म्हणणें एकमेकींशीं जुळतें दिसलें, तर मग कसलीच अडचण राहिली नाहीं. आणि जर त्या परस्पर भिन्न अर्थ सुचवूं लागल्या तर खऱ्या खोट्याचा निर्णय करून ज्या प्रती आपल्या न्याय बुद्धीनें खऱ्या म्हणून ठरतील, त्यांसारखा न्याय द्यावा. आणि जर सर्व प्रती मिळून सदोष असें कांहीं तरी अनुमान निघतें असें वाटलें, तर एकच प्रत जवळ आहे अशा स्थितींत जसें आपण करूं, तसें करावें.

## (६) बाह्य चर्चा — कागदपत्रांच्या कर्तुत्वाचें परीक्षण

कागदपत्र हातांत आल्यावर, साहजिकपणें, हा कधीं लिहिला आहे, कोठें लिहिला आहे, व कोणीं लिहिला आहे, हे प्रश्न आपल्या मनांत येतात. ज्या कागदपत्रांची तारीख आपणांस ठाऊक नाहीं त्यांस आपण फारसें महत्त्व देत नाहीं.

अलीकडे आपलीं रोजचीं खासगी पत्रें, वर्तमानपत्रें, सरकारी कागदपत्रें ह्या सर्वांवर तारीख, ठिकाण व कर्त्याची सही ह्या तीन अपेक्षित व आवश्यक गोष्टी असतातच. तशी स्थिती प्राचीन काळाची नाहीं. पुष्कळ कागदपत्रांवर तारीख असते, तर ठिकाण नसतें, ठिकाण असतें तर कर्त्याचें नांव नसतें आणि बहुशा या तिन्हींपैकीं एकही नसतें.

कोणत्याही कागदपत्राच्या कर्तृत्वाविषयीं माहिती झाल्याशिवाय आपला त्यावर इतका भरंवसा बसत नाहीं, हें स्वाभाविक आहे. कारण, कोणत्याही गोष्टीला जें महत्त्व येतें तें पुष्कळ अंशीं तिच्या कर्त्यावर अवलंबून असतें. कर्त्याच्या स्वरूपावरून व योग्यतेवरून लेखाची योग्यता व किम्मत ठरते. याकरितां कर्त्यासंबंधीं जितकी माहिती मिळेल, तितकी आपणांस पाहिजे असते. त्याचा दर्जा काय होता, त्याचा लौकीक कसा होता, त्याचें वर्तन कसें होतें, त्याचा स्वभाव कसा होता, त्याची विद्वता कशी होती, इत्यादि गोष्टींसंबंधीं बारीक माहिती जितकी मिळेल तितकी हवी असते. परंतु अशी कर्त्याची फारच थोडी माहिती आपणांस उपलब्ध असते. अगदीं प्राचीन काळच्या पुष्कळ लेखकांसंबंधींची माहिती त्यांच्या नांवापलीकडे फारशी नसते. कित्येक चांगल्या ग्रंथकारांचा व

कवींचा स्थूलमानानें देखील काल निर्णय झालेला नाहीं. अशी जेथें ख्याती आहे तेथें आपणांस अपेक्षित असलेल्या दुसऱ्या गोष्टींची वार्ता कशाला ? अशा वेळेस त्या कर्त्यांचें लेखांत त्याचे स्वतःसंबंधीं काय माहिती मिळते इकडे शोधकांस डोळ्यांत तेल घालून बघावे लागतें. कित्येक वेळां एखाद्या कवीच्या ,काव्यांतील एखादी ओळ, एखादा ताम्रपट, व एखाद्या युरोपीयन किंवा चिनी गृहस्थाचा लेख याची एकमेकांशीं तुलना करून व त्यांचा खल करून कांहीं तथ्यांश निघाला तर पहावा लागतो ! अशा स्थितींत अटकळ पंचविशीचें विशेष प्राबल्य असतें. एकदां कां यांत तर्काची दिशा चुकली, म्हणजे सदोष अनुमान निघूं लागतात ! अशा तऱ्हेनें कित्येक विद्वानांनीं विलक्षण तर्कटें रचलेलीं आपणांस ठाऊक आहेत. याकरितां, ही चर्चा करतांना फार सावधगिरी बाळगली पाहिजे. चर्चेचा दुरुपयोग मुळींच चर्चा न करण्या इतकाच, किंबहुना जास्त, अपायकारक आहे ! चर्चेचा अतिरेकही उपयोगी नाहीं व अभावही कामाचा नाहीं.

हें कागदपत्रांच्या कर्तृत्वाचें परीक्षण पुष्कळ दृष्टींनीं आवश्यक व फायदेशीर आहे. इतिहासांत होणाऱ्या ढोबळ चुका ह्यामुळें होतात. बाह्य चर्चेंतील हें एक महत्त्वाचें अंग आहे. कागदपत्र खरे कोणते, खोटे कोणते, कोणते किती योग्यतेचे, कोणते ग्राह्य, कोणते त्याज्य आहेत, हें यामुळें समजतें. बाह्य चर्चेच्या या अंगासंबंधीं जर इतिहासकारानें हयगय केली, तर पुढील चर्चा करिताना तो कोठेंतरी धडपडावयाचाच. कारण खोटे व बनावट कागदपत्र मध्यें येऊन त्यांच्या अनुमानांची इमारत सदोष व चुकीची करावयाचे. एतदर्थ या अंगाचें बारीक विवेचन होणें इष्ट आहे. कागदपत्र एवढ्या श्रमानें जमविले व या अंगासंबंधीं चर्चा करितांना कांहीं खोटे किंवा बनावट ठरून टाकून द्यावे लागतील, केवळ येवढ्याच कल्पनेनें या अंगाच्या विवेचना-संबंधीं डोळेझाक करणें कधींही क्षम्य होणार नाहीं. सत्यास अपायकारक जेवढें म्हणून असेल तेवढें आपणांस टाकून दिलेंच पाहिजे. कधीं कधीं ही चर्चा कर-तांना असें आढळून येतें कीं, नसत्या गोष्टीचें कर्तृत्व एखाद्या गोष्टीवर लादलेलें असतें, अगर भलत्याच गोष्टीचा कर्ता भलत्याला बनविलेला असतो. अशा तऱ्हेनें अनेक दृष्टींनीं बाह्यचर्चेचा हा भाग आवश्यक, उपयुक्त व महत्त्वाचा आहे.

चर्चा केल्याशिवाय कर्तृत्वाचें आरोपण बरोबर आहे किंवा चुकीचें आहे हें कळावें कसें ? अमका एक इसम कवि, चितारी अगर ग्रंथकार होता ना ? मग त्याचे नांवावर विकेल तेवढें विका, असा मतलबी लोकांचा उद्योग असतो

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ४५९५३ विः निबंध
2935 नोंद दि. 22/3/67

कालिदास उत्तम कवि ना ! मग आपलेंही एक काव्य त्याचेंच नांवावर प्रसिद्ध करावें, अशा मतलबी बुद्धीनें कितीक कवींवर खोट्या ग्रंथाचे आरोपण झालें आहे ! हे उमगण्यास चर्चा ही किती आवश्यक आहे बरें ? पण कालिदासानें काव्यें व नाटकें किती लिहिलीं यासंबंधीं शोधार्थ चर्चा करण्याची उठाठेव करतो कोण ? मनुष्यस्वभाव विलक्षण भोळा आहे ! त्याला त्याच-प्रमाणें चर्चेचा पराकाष्ठेचा कंटाळा आहे ! आजपर्यंत कालिदासाच्या नांवावर विकत असलेल्या काव्यांपैकीं कांहींस शोधक विद्वानांच्या हातून अर्धचंद्र मिळालेला आहे. त्याचप्रमाणें 'कालिदासाच्या चातुर्याच्या गोष्टी' आपल्या करमणुकीच्या, आनंदाच्या व अभिनंदनाच्या कायमच्या वतनदार होऊन बसलेल्या आहेत. पण हा कालिदास व कवि कालिदास हे दोघे एकच का वेगळाले, याचा कांहीं निर्णय व्हावयास नको काय ? कित्येक चांगल्या प्रसिद्ध चित्रकारांच्या नांवावर एखादें दुसऱ्यानें केलेलें चित्र बिनहरत विकावें ! असे नाना तऱ्हेचे भ्रामक, कुत्सित, मतलबी किंवा चुकीचे आरोपणाचे प्रकार आहेत. ते सर्व सांगत बसल्यास विस्तार फार होईल, तेव्हां एवढ्यावरच थांबूं.

कित्येक वेळां ग्रंथकाराच्या मजकुरांत टीकाकार किंवा प्रती करणारे आपल्या पदराचा मजकूर दडपून देतात. स्त्रियांची कोणतीही मिरवणूक अगर समारंभ पाहण्याबद्दल किती उत्कंठा असते व ती खिडकीशीं अगर दाराशीं पहावयास जातांना त्यांची कशी धांदल होते, याचें हुबेहूब वर्णन कालिदासानें रघूच्या सातव्या सर्गांत मोठ्या बहारीनें केलेलें आहे. त्या वर्णनभूत श्लोकांतील एक श्लोक बनावट म्हणून विद्वानांनीं चर्चा करून शोधक बुद्धीनें निवडून काढला आहे; असें हें एकच उदाहरण नाहीं. अशा कालिदासाच्या व त्याच्यासारख्या दुसऱ्या अनेक कवींच्या काव्यात शोधकांनीं पुष्कळ बनावट भाग शोधून काढला आहे. येथें हें एक मासल्याकरितां उदाहरण दिलें. आता ही टीकाकारांची लबाडी चर्चा केल्यावांचून उघडकीस कशी येणार ? अशा रीतीनें हें कर्तृत्वाचें परीक्षण खोट्यास चव्हाट्यावर आणून त्याची फजीती करतें. तर आतां हें परीक्षण कसें करावयाचें व त्याला साधनें काय काय आहेत यासंबंधीं विवेचन करूं.

या परीक्षणाला मुख्य साधन म्हटलें म्हणजे आंतील मजकुराचा बारीक विचार हें होय. प्रथमतः लेखनपद्धतीची तऱ्हा कशी व कोणत्या काळची आहे, हें ठरवावयाचें. नंतर भाषेचा विचार करावयाचा, त्यांतील शब्दांवरून, वाक्य-रचनेवरून व विशेष सांप्रदायिक वाक्यांवरून काल ठरविणें, आपणांस फारसें जड जात नाहीं. त्याचें आपणांस सामान्य अनुमान होतें. येथेंच लबाड लोकांचा

खोटेपणा उघड्यावर येतो. तो असा कीं, अर्वाचीन लेख असून प्राचीन भासविण्याची खटपट केली असल्यास त्यांतले अर्वाचीन शब्द हळुच वर डोकें काढतांना दिसतात. अशा रीतीनें त्यांची लबाडी खपली जात नाही. शेवटीं कागदपत्रांतील माहितीवरून कालनिर्णय विशेष निश्चित होतो. नंतर विषय प्रतिपादण्याची त्यांची हतोटी, अमकी एक आवडीनें सांगणें, दुसरीबद्दल तिरस्कार दाखविणें, लिहितांना प्रदर्शित केलेलीं निरनिराळ्या गोष्टीवरील मतें, वगैरे गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण केलें असतां कर्त्यांच्या स्थितिरितीविषयीं, स्वभावाविषयीं, मतांविषयीं, वर्तणुकीविषयीं, तर्कानें बरेंच अनुमान होण्यासारखें आहे.

भर्तृहरीनें आपल्या ग्रंथांतून कोणकोणत्या देवतांची विशेष आस्थेनें स्तुति केली आहे हें धुंडून काढून त्यावरून तो शैव होता किंवा वैष्णव होता अथवा अद्वैतवादी वेदांती होता हें ठरवावयाचें. भर्तृहरीच्या नीतिशतकांतील पहिल्या श्लोकावरून त्याच्यासंबंधीं विद्वानांनीं कांहीं अनुमान बांधिलें आहे. ग्रंथकाराच्या स्वाभाविक मनोवृत्तींचा कमीजास्त मानानें त्यास नकळत त्याच्या लेखांत प्रवेश होतो; त्यावरून अनुमानें बांधावयाची.

ग्रंथकार कधीं कधीं एकमेकांच्या ग्रंथांतील अवतरणें घेत असतात. भर्तृहरीचे शतकांतील कांहीं श्लोक शाकुंतल, मुद्राराक्षस व मृच्छकटिक यांत सांपडतात. प्रत्येक ग्रंथकाराच्या भाषेची धाटणी एक ठरीव असल्यामुळें त्यानें लोकांपासून उसनें घेतलेलें कोणतें तें त्याच्या मूळापासून वेगळें काढतां येतें. या अवतरणांपासून व उसनें घेण्यापासून ग्रंथकारांचा एकमेकांशीं कसा संबंध होता व त्यांचा काळ काय होता, हें समजण्यास आपणांस पुष्कळ मदत होते.

उसनें घेणें, अवतरणें करणें यांचा जसा वर निर्देश केला आहे, तसा ग्रंथचर्चेचाही केला पाहिजे. अमके एक पुस्तक अमक्या सालीं, अमक्या ठिकाणीं अमक्या माणसानें लिहिलें, इतकें आपणांस कळलें तर तेवढ्यानें आपलें समाधान होईल काय ? नाहीं. हा अमका माणूस यानेंच खरोखर तें पुस्तक लिहिलें, किंवा दुसऱ्याचें चोरून घेतलें ? असा कधीं कधीं संशय येणें साहजिक आहे. ग्रंथचौर्यास या काळांत शिक्षा आहे खरी; पण अशी पूर्वीची स्थिति नव्हती. याकरितां, अशा तऱ्हेचा संशय आल्यास धड डोक्यानें त्याचा निर्णय करावा.

## (७) कागदपत्रांतील माहितीचें एकीकरण व कागदपत्रांचें वर्गीकरण

मागील भागांतून सांगितल्याप्रमाणें कृतीवरून कागदपत्र कोठले आहेत, ते

कधींचे आहेत, त्यांचें मूळ काय व त्यांचा कर्ता कोण हें आपण शोधून काढलें; आतां त्यांतील माहिती एकत्र करावयाची व त्यांचें वर्गीकरण करावयाचें बाकी राहिलें आहे. हें बाह्यचर्चेंतील शेवटलें अंग होय.

आपणास मिळालेली निरनिराळ्या प्रकारची माहिती व्यवस्थेशीर लावून तिचा प्रसंगानुरूप उपयोग करणें हें इतिहासकाराच्या कर्तव्यांपैकीं एक महत्त्वाचें कर्तव्य होय. ही निरनिराळी माहिती व्यवस्थित लागून ती स्वतःस वाटेल त्या वेळेस सुमन करून घेतां येणें एखाद्यास जसें साधतें, तसें प्रत्येकास साधणें मुष्कील आहे. तथापि, या संबंधाचा विद्वानांनीं जो मार्ग पसंत केला आहे, त्या मार्गानें आपण गेलें असतां आपणांस पुष्कळ सुखाचें व सोईचें होईल. या कामांत मुरलेले व कसलेले वाकबगार लोक थोडक्या श्रमानें पुष्कळ फलप्राप्ती करून घेतात. तेच गैरमाहीत व नवे लोक जमविलेल्या कागदपत्रांच्या भाऱ्याखालीं दडपून जातात; व त्यांची कशी व्यवस्था लावावी हें ते गोंधळून गेल्यामुळें त्यांना नीट उमजत नाहीं.

कागदपत्रांतील माहितीचा आपणांस उपयोग करितां यावा म्हणून ती एकत्र करण्याचे प्रकार आहेत ते हे :– (१) पहिला प्रकार टिप्पणें करून घेण्याचा. वाचतांना जे कांहीं कागदपत्र येतील त्यांचीं वाचनाच्या अनुक्रमानें टिप्पणें करून ठेवावयाचीं व अशा रीतीनें प्रसंगी त्या माहितीचा उपयोग करावयाचा, असा कित्येकांचा सांप्रदाय आहे. ही पद्धत चुकीची आहे. कारण, आपण सारखीं टिप्पणं करीत जाणार, त्या वेळेस एकाच मुद्यासंबंधाची माहिती एकाच ठिकाणीं लिहून ठेवावयाची व्यवस्था आपण करीत नाहीं. तेव्हां अमक्या एका गोष्टीसंबंधानें आपणांस माहिती हवी असल्यास, आपणांस तें टिप्पणाचें सबंध बाडच्या बाड प्रत्येक वेळेस वाचावें लागणार. ही टिप्पणाच्या वहीची पद्धत सकृतद्दर्शनीं बरीशी वाटण्याचा संभव आहे; कारण तीत वेळ बराच वांचतो, असा प्रथमतः भास होतो. मिळेल ती माहिती चटकन् उतरावयाची म्हणजे झालें. पण हा निव्वळ भ्रम आहे. कारण मागाहून माहिती मिळविण्यासाठीं जेव्हां तें बाड आपण शोधूं लागतों, तेव्हां वेळ बराच जाऊन, वेळ वांचतो ही कल्पना ऱ्हास पावते सारांश, ही पद्धत गैरसोईची व त्रासदायक आहे.

हीच टिप्पणाच्या वहीची पद्धत सुधारून प्रत्येक विषयाला कांहीं पानें देऊन तिचे विभाग करण्याचा व्यवस्थित प्रयत्न केलेला दिसतो. ही तऱ्हा म्हणजे वाण्याच्या खातेवहीप्रमाणें होय. गोमाजी बिन तिमाजीचे खात्याकरितां

दोन तीन पानें राखून ठेविलेलीं. पण ही पद्धतही सुखाची व सोईची नाहीं. कारण आपली प्रत्येक विषयावरील इतकींच पानें होतील, असा कांहीं नियम नाहीं. तेव्हां हींतही अर्थ नाहीं.

( २ ) ह्याच्यापेक्षां एक रानटी चाल आहे; व ती इतकी तिरस्करणीय व त्याज्य आहे कीं तिचा जातां जातां नुसता निर्देश करणेंच तिच्या खंडनास पुरेसें आहे. ही चाल टिप्पणें वगैरे न करतां जे कांहीं मिळेल तें आपल्या स्मृतिभांडारांत सांठवावयाचें. पुष्कळ आळशी इतिहासकारांनीं आपल्या दांडग्या स्मरणशक्तीच्या वमेंडीवर या पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. परंतु ह्याचा परिणाम म्हणजे ऐतिहासिक ग्रंथांची सदोषता. ऐतिहासिक गोष्टींसंबंधीं घोंटाळा, एखाद्या ऐतिहासिक मनुष्याच्या तोंडचें वाक्य म्हणून मुळांतलें कांहीं विसरून जाऊन त्यांत आपल्या डोक्यांतली घातलेली भर, इत्यादि दोष घडण्याचे कारण ही दुष्ट पद्धति होय. ह्या पद्धतीमुळें, सत्याला धक्का बसण्याचा पुष्कळ संभव असतो. मानवी स्मृति हें अतिशय नाजूक यंत्र आहे. त्यावर अवजड भार घालणें व त्याचा लहान जीव न पाहातां तंतोतंत माहिती त्यापासून उकरून काढण्याचा आव घालणें कधींही क्षम्य होणार नाहीं.

( ३ ) सर्व शोधकांच्या मतें, निरनिराळ्या कागदांच्या कपट्यांवर माहिती लिहून मागाहून ती जुळवून व्यवस्थित लावण्याची पद्धत उत्तम आहे. तीच सध्यां चहूंकडे प्रचारांत अन थोडक्याच अवधींत ती सर्वमान्य होऊं पहात आहे. कागदपत्रांतील माहिती मोकळ्या कागदाच्या तुकड्यावर तिच्या मुळाचा निर्देश करून उतरून काढावयाची. या पद्धतीपासून होणारे लाभ उघड आहेत. कागदपत्रांचे कपटे मोकळे असल्यामुळें, आपणांस वाटेल त्या वेळेस व वाटेल तसे जुळवितां येतात; पुन्हां जरूर वाटल्यास त्यांचा क्रम बदलतां येतो. एकाच जातीचे कपटे एकाच जागीं लावतां येतात प्रत्येक कागदाच्या शिरोभागीं माहितीच्या मूळाचा, कागदपत्रांचा निर्देश केल्यामुळे त्याची माहिती व ओळख आपणांस पुष्कळ होते.

या मोकळ्या कागदांच्या तुकड्यांच्या पद्धतीचे जसे गुण सांगितले तसे तींत कांहीं अवगुण असणेंही साहजिक आहे. त्यांस आपण जपलें पाहिजे. हे तुकडे मोकळे असल्यामुळें इकडे तिकडे जाऊन सहज नाहींसे होण्याचा फार संभव आहे. परंतु ह्याचा प्रतिकार करण्यास थोडीशी खबरदारी घेतली म्हणजे झालें. तिचा येथें विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण प्रत्येकजण आपल्या बुद्धीप्रमाणें त्याची व्यवस्था लावील.

आतां कागदपत्र कोणत्या अनुक्रमानें लावावयाचे हा प्रश्न राहतो. ‘ कालानुक्रम, ’ ‘ विषयानुक्रम, ’ व ‘ वर्णानुक्रम ’ असे तीन प्रकार करतां येतील. प्रथम कालानुक्रम घेऊं; पण त्यास एक अडचण आहे. ती ही कीं प्रत्येक कागदावर तारीख सांपडणें कठीण आहे, म्हणून ही व्यवस्था सर्व ठिकाणीं सारखी लागू पडणार नाहीं. तथापि कागदपत्रांच्या कालाचें साधारण अनुमान विद्वान शोधक आंतील मजकुराच्या सहाय्यानें करूं शकेल. दुसरा विषयानुक्रम. हा कांहीं ठिकाणीं सोईचा आहे; पण कांहीं ठिकाणीं तो अतिशय घोंटाळ्याचा व पुनरुक्तीचा होतो. वर्णानुक्रमही कांहीं ठिकाणीं उत्तम व सोईस्कर आहे. म्हणून प्रसंग पाहून हे तीन्ही प्रकार उपयोगांत आणावेत.

## ( ८ ) बाह्यचर्चा व तिचें महत्त्व.

मागील तीन भागांत बाह्यचर्चेचा सर्व भाग आटोपला. आतां तिच्या संबंधी निरनिराळ्या लोकांचे काय समज आहेत व तिची खरी स्थिति व वास्तविक योग्यता काय आहे, ह्यांचा विचार करण्याचें या भागांत योजिलें आहे.

ह्या चर्चेसंबंधानें सामान्य लोकांस अतिशयित तिटकारा आहे. दुसऱ्या पक्षीं, तिचे कैवारी आहेत ते तिची वाजवीपेक्षां फाजिल स्तुति करितात. परंतु एकीकडे स्तुतीचा अतिरेक व दुसरीकडे तिरस्काराचा कडेलोट ह्या दोन टोकांचा संबंध अजिबात सोडून देऊन, वास्तविक तिची योग्यता काय आहे, हें आपण पाहूं.

चर्चेसंबंधीं जे लोक तिरस्कार दाखवतात, त्यांचें खंडण करण्याची जरूरीच नाहीं. कारण चर्चेवांचून इतिहासाचें चालावयाचेंच नाहीं, हें उघड आहे. इतिहासास चर्चा अत्यावश्यक आहे; जर चर्चा नाही, तर इतिहासही नाहीं.

दुसऱ्या पक्षीं, कांहीं शोधक व विद्वान लोक तिच्या फाजील अभिमानाचें भरांत तिची नुसती आवश्यकता सिद्ध करून थांबत नाहींत. ते दुरभिमानामुळें तिच्या गुणाच्या व महत्त्वाच्या अतिशयोक्तिरूप लोटाबरोबर वाहवले जातात. ते म्हणतात, ‘ ह्या बाह्यचर्चेच्या अचूक पद्धतीनें आम्ही इतिहासास केवळ प्रत्यक्ष शास्त्राचीच प्रौढी आणिली आहे. कर्तृत्वाच्या परिक्षणानें आपणांस मागील काळची जशी माहिती मिळते, तशी दुसरी कशानेंहि मिळत नाहीं. खुद्द कागदपत्रांच्या चर्चेमुळें इतिहास पुष्कळ सुधारला जातो. ’ म्हणजे, या लोकांचा असा समज झालेला दिसतो कीं, बाह्यचर्चा म्हणजे ऐतिहासिक चर्चेचें सर्वस्व होय. परंतु

हा निव्वळ भ्रम आहे. कागदपत्रांची बाह्यचर्चा, कर्तृत्वाचे परीक्षण व कागदपत्रांचें वर्गीकरण, एवढ्यांनींच ऐतिहासिक चर्चा संपत नाहीं. हा तर नुसता आरंभ आहे; महत्त्वाचा भाग आहे, तो पुढेंच आहे. शिवाय मागील काळासंबंधीं जी आपणांस माहिती मिळते, ती आंतील चर्चेंपासून मिळते; ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें, बाह्यचर्चेपासून नव्हे. बाह्यचर्चा जर आधींच कोणी करून ठेविली असेल तर इतिहासकारांस ती पुन्हां मुळींच करावयास नको. त्याला यापेक्षां दुसरीं महत्त्वाचीं कामें पुष्कळ आहेत. बाह्यचर्चेच्या योगानें कागदपत्रांच्या बाह्यांगाचें परीक्षण होतें. त्यांच्या अंतरंगाची परिक्षा, त्या चर्चेनें होत नाहीं. तीस 'आंतील चर्चे'ची जरूरी आहे. बाह्यचर्चेनें कागदपत्रांचा मळ झडतो. बाह्यचर्चा हें एक फलप्राप्तीचें साधन आहे; तीच फलप्राप्ति नव्हे. बाह्यचर्चेची जरूर आपणांस नेहमींची नाहीं; ती हंगामी आहे. असा एक दिवस लौकरच येईल कीं, ज्या दिवशीं सर्व कागदपत्रांचा बाह्यचर्चेचा विधी उरकून, ते छापून पुढच्या विधीस तयार झाले आहेत.

आजपर्यंत विद्वान शोधक व इतिहासकार यांचे उद्योग अगदीं वेगवेगळाले होते. इतिहासकाराचें काम म्हणजे, विद्वान शोधकांच्या प्रयत्नांशीं कोणत्याही तऱ्हेचा संबंध न ठेवितां, उत्तम भाषेंत एक ग्रंथ तयार करणें. त्या ग्रंथास लोक इतिहास असें म्हणत. दुसऱ्या पक्षीं, विद्वान शोधक शोध करकरून माहिती जमा करीत व 'इतिहास' कसा लिहिला जावा, यासंबंधीं नियम बांधीत; परंतु स्वतः इतिहास लिहिण्याची त्यांनीं कधीं तसदी घेतली नाहीं. ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध, चर्चा व वर्गीकरण या पलीकडे त्यांनीं पाऊल ठेविलें नाहीं. विद्वान शोधकांस वाटे, शोध करणें झालें म्हणजे संपले. इतिहासकारांस वाटे, त्यांच्या शोधाकडे लक्ष देऊन इतिहासांतील गोष्टींचा विपर्यास झाला असल्यास, त्याची दुरुस्ती करण्याची जरूरी नाहीं; मनास वाटेल तसा कल्पनेनें इतिहास रचावा! ही अशी स्थिति कशी होती, याचा आपणांस चमत्कार वाटतो! परंतु अलीकडे ती स्थिति मावळून, एकमेक एकमेकांच्या मेहनतीचा उपयोग करूं लागले आहेत, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे.

आतां चर्चा करतांना आपल्या मनाची समता शोधकानें ढळूं देतां कामा नये. कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह मनांत असतां कामा नये. त्याचप्रमाणें, चर्चेचा अतिरेक उपयोगाचा नाहीं, किंवा उठल्या बसल्या संशय घेणें चांगलें नाहीं. केवळ कल्पनेच्या भरांत, सत्याचा ठाव काढावयाचें सोडून कित्येक वेळां हास्यास्पद अनुमानें काढण्यांत आलेलीं आहेत. तेव्हां त्यास फार जपलें पाहिजे.

श्रमविभागाचें तत्त्व पाहिलें पाहिजे, वगैरे गोष्टी मागें सांगण्यांत आलेल्याच आहेत. यास्तव त्यांचा येथें विस्तार करणें नलगे. "आंतील चर्चा" ही अत्यंत महत्त्वाची आहे. ती फार सावधगिरीनें व शांत डोक्यानें केली पाहिजे. आवडीवांचून हीं कामें हातीं घेतल्यास तीं नीट तडीस जात नाहींत.

## (९) आंतील चर्चा–अर्थासंबंधीं चर्चा

जेव्हां प्राणिशास्त्रवेत्ता एखाद्या स्नायूच्या आकाराचें व त्याच्या स्थितीचें वर्णन करतो, किंवा जेव्हां आपण युक्लीडचा सिद्धांत वाचतो, त्यांचे सिद्धांत आपण मनांत कोणत्याही तऱ्हेचा संशय न बाळगितां ग्रहण करतों. याचें कारण काय? याचें कारण एवढेंच कीं, त्यांनीं ते सिद्धांत कोणत्या व कशा पद्धतीनें काढले आहेत हें आपणांस ठाऊक आहे. परंतु जेव्हां एखादा जुना इतिहासकार इतिहास ग्रंथांत कांहीं विधानें करतो तेव्हां तीं आपणांस वरील सिद्धांतांप्रमाणेंच बरोबर धरतां येणार नाहींत. कारण, त्यांची माहिती मिळविण्याचीं साधनें कशीं होतीं, याचें आपणांस बिलकुल ज्ञान नाहीं. यास्तव, त्याच्या विधानांचा खरेखोटे-पणा ठरविण्याला 'आंतील चर्चा' हाच एक मार्ग आहे.

कागदपत्रांत खरेखोटेपणाचा भाग किती आहे, हें शोधून काढणें, 'आंतील चर्चे'चें काम आहे. कोणत्याही गोष्टीचे अवलोकनास आरंभ झाल्यापासून, ती कागदावर नमूद करीपर्यंत होणारे जे मनाचे व्यापार त्यांच्याशीं आंतील चर्चेचा संबंध आहे. आतां, कागदपत्र हें कर्त्याच्या दीर्घ कृतीचें फळ होय. त्या कृतीं-संबंधानीं कर्ता आपणांस कांहीं सविस्तर माहिती देत नाहीं. त्याला गोष्टींचे अवलो-कन करावें लागते, किंवा त्या गोळा कराव्या लागतात; वाक्यरचना करावी लागते; शब्दांची जुळणी करावी लागते, आणि परस्परापासून भिन्न असलेल्या ह्या सर्व कृती कदाचित त्यांच्याच्यानें नीटपणें झाल्या नसतील, म्हणून कर्त्याच्या कोणत्या कृती चुकीच्या आहेत, हें शोधून काढून त्यांच्या उपपत्तींचा त्याग करण्याकरितां कर्त्याच्या ह्या श्रम–समूहाचें पृथक्करण करणें आवश्यक आहे. सारांश, चर्चेस पृथक्करणाची जरूरी आहे. प्रत्येक चर्चेस पृथक्करणापासून प्रारंभ होतो.

कर्त्यानें केलेल्या सर्व कृती पुन्हां करणें, हें पृथक्करणाचें काम होय. प्रत्येक कृति, बरोबर रीतीनें केली आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां तिचे क्रमशः परीक्षण केलें पाहिजे. कर्त्याला ती गोष्ट कळल्यापासून ती त्यानें कागदावर नमूद

करीपर्यंत, त्याच्या झालेल्या सर्व क्रियांचा विचार करणें अगत्याचें आहे. मात्र, तो आपणांस शेवटाकडून आरंभाकडे करीत गेलें पाहिजे.

'आंतील चर्चा' ही 'बाह्य चर्चे'प्रमाणें सुखाची नाहीं; तीपासून मनाचें समाधान होत नाहीं. कारण, तिजपासून कोणत्याही गोष्टीचा निश्चित असा उलगडा होत नाहीं. तिचा उपयोग करावयाचा म्हणजे, तो करणें भाग आहे, त्याजवांचून गति नाहीं, म्हणून करावयाचा. असो.

अतिशय सूक्ष्म दृष्टीचे इतिहासकार आंतील चर्चेचे दोन भाग करितात :– (१) कागदांतील मजकुरांचें पृथक्करण व कर्त्याचें म्हणणें ठरविण्याकरितां 'आंतील चर्चा'. (२) ज्या स्थितीमध्यें कागद लिहून तयार झाला त्यासंबंधीं विचार. हा विचार कर्त्यानें केलेल्या विधानांच्या समर्थनार्थ आवश्यक आहे. आपल्याला अर्थासंबंधीं चर्चा करावयाची म्हटली म्हणजे, कर्त्याचें खरें म्हणणें काय आहे, हें शोधून काढावयाचें. हें काम बिनचूकपणें उरकण्यास ज्या भाषेंत ते कागदपत्र असतील तिचें चांगले ज्ञान संपादिलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर विशिष्ट देशांतील विशिष्ट ग्रंथकारांची विशिष्ट भाषापद्धतीचीही चांगली माहिती पाहिजे.

कागदपत्र हातांत आल्यावर, त्यांतील भाषाशैली अगर लेखकांचीं मतें यांनीं आपलें मन दूषित होऊं नये, म्हणून त्याचा शब्दशः काय अर्थ होतो, तो अगदीं साध्या भाषेंत कागदाच्या कपाळ्यावर उतरून काढावयाचा, एवढेंच या भागाचें काम आहे.

हा अर्थ करतांना कित्येक वेळां अर्थासंबंधी पुष्कळ अडचणी येण्यासारख्या आहेत. परंतु यासंबंधीं येथें विस्तार करणें नलगे. किंबहुना, जरी हा महत्त्वाचा भाग आहे, तरी त्यावर जास्त लिहिणें शक्य नाहीं. काय काय अडचणी येतील त्या प्रत्येकीचा निर्देश करतां येणें मुष्कील आहे. भाषेंत प्राविण्य असावें; तें त्यास उपयोगी आहे, एवढेंच कायतें म्हणतां येईल.

कित्येकवेळां शब्दशः अर्थ लागू पडत नाहीं, कर्त्याची भाषा, गूढार्थ, अन्योक्ति किंवा अलंकार ह्यांनीं युक्त असल्यास, शब्दशः अर्थ साहजिकपणें चालणार नाहीं. यास्तव, लेखाच्या विचारपद्धतीस योग्य तोच अर्थ घ्यावा.

## (१०) लेखकाच्या इमानाविषयीं व त्यानें दिलेल्या माहितीच्या खरेपणाविषयीं चर्चा

कर्त्याचे विचार त्यानें मांडलेल्या भाषापद्धतीवरून आपण काढिले. परंतु त्यानें सांगितलेल्या गोष्टी खरोखरी घडल्या किंवा नाहींत, त्या काल्पनिक आहेत कीं काय, इत्यादि शंकांचें निरसन होणें राहतेंच. लेखकानें जें लिहिलें तें खरें कशावरून ! कदाचित त्यानें खोटें लिहिलें असेल; खोटें लिहिलें नसल्यास, कदाचित चुकीचें लिहिलें असेल, वास्तविक गोष्टीसंबंधीं त्याचा गैरसमज झाला असेल. असें होणें कांहींच चमत्कारिक नाहीं, तरी आपल्या मनाची प्रवृत्ति काय असते कीं, जेवढें कागदपत्रांत लिहिलें आहे, तेवढें सर्व खरें. पण असा ग्रह असणें म्हणजे, कोणीही मनुष्य खोटें बोलावयाचा नाहीं, किंवा गैरसमजानें चुकीचें लिहावयाचा नाहीं, असें म्हणण्यासारखें आहे. तथापि, वास्तविक स्थिती अशी नाहीं. इतिहासकारांना व शोधकांना, कागदपत्रांची चर्चा करतांना अशा लबाड्या दिसून आलेल्या आहेत. यामुळें संशय येणें स्वाभाविक आहे. इतिहासशास्त्रांत "पद्धतशीर संशय" अगदीं जरूरीचा आहे. इतिहासशास्त्रज्ञाची वृत्ति अतिशयित संशयी असली पाहिजे. कोणत्याही गोष्टीचा खरेपणा जोखल्याशिवाय ती खरी मानणें साहसानें आहे.

आतां खरेपणा जोखावयाचा म्हणजे, मजकुराचें परीक्षण करून पहावयाचें. परंतु कागदपत्रांतील सर्व गोष्टींचें एकदम परीक्षण करणें बरोबर नाहीं. त्यांतील प्रत्येक विधानाचें वेगवेगळालें परीक्षण करणें जरूर आहे. पृथक्करणावांचून परीक्षण करणें अशक्य आहे. कधीं कधीं एकाच वाक्यांत अनेक विधानें असतात. तीं मग एकमेकांपासून अलग करून त्यांचे एकमेकानें क्रमशः पृथक्करण व परीक्षण करावें लागतें. आपण विक्रींत जशी तारीख, ठिकाण, विकणारा, गिऱ्हाईक, विकाऊ वस्तु, किम्मत आणि त्यासंबंधीं अशी प्रत्येक गोष्ट, वेगवेगळी करतों, त्याप्रमाणेंच आपणांस येथें केलें पाहिजे.

कोणत्याही गोष्टीचा शास्त्रीयपद्धतीनें खरेपणा जोखावयाचा म्हणजे तिचें परीक्षण आहे. परंतु कांहीं प्रसंगीं, हें अमक्या लेखकाचें अगर ग्रंथकर्त्याचें विधान आहे, एवढेंच कारण त्यावर भरंवसा ठेवण्यास पुरेसें असतें. तथापि असे प्रसंग एकंदरींत फारच थोडे. नेहमींची आपली वहिवाट म्हटली म्हणजे, चर्चा व पृथक्करण हीं दोन्हीही बरोबरच करावयाचीं. पण एखादे वेळेस कठिण भाषेचा

कागद आपल्या हातीं चर्चेस येतो, अशा वेळेस तसें करणें शक्य नसतें. बाकी सर्व ठिकाणीं आपण अर्थाचें पृथक्करण व चर्चा हीं दोन्हीही एकाच वेळेस करतों. वाक्य समजल्याबरोबर, आपण त्याचें पृथक्करण करतों आणि त्यांतील प्रत्येक तत्त्वासंबंधीं चर्चा करावयास लागतों. कर्त्याच्या विधानांची योग्यता केवळ त्याच्या मानसिक क्रियांवर व त्याच्या स्थितीवर अवलंबून आहे. चर्चेला या मानसिक क्रियांचें परीक्षणावांचून दुसरी गतीच नाहीं. हा लेख लिहितानां, कर्त्याची मानसिक स्थिति चांगली होती किंवा दूषित होती, हें कसें ठरवावयाचें, या प्रश्नाचा विचार हा या भागाचा विषय आहे.

कर्तृत्वाचें परीक्षण करतानां कर्त्यासंबंधी व त्याच्या मानसिक स्थितीसंबंधीं आपणांस कांहीं माहिती मिळाली. ती जितकी विस्तृत मिळेल तितकी आपणांस हवीच आहे. या माहितीचें व लेखांचे मनन करून कर्त्याची संवय, विचार, त्याची स्थिति व हा लेख लिहितेवेळेस त्याची असलेली परीस्थिति, यांचे बारकाईनें निरीक्षण केलें पाहिजे. म्हणजे, कोणत्या मनोवृत्तीचा अगर स्थितीचा जोर होऊन, त्याचा लेख बरोबर किंवा दूषित असा लिहिला गेला, हें आपणांस कळेल.

कोणत्याही विधानाच्या खरेपणाच्या दिखाऊ डौलावर जाऊन त्यावर निःशंकपणें विश्वास ठेवण्यास प्रवृत्त होऊं नये. पुष्कळ वेळां बाह्यांगाचें डौलानें अवास्तव ग्रह होण्याचा संभव असतो. याकरिता, चर्चेची कास कधींही सोडूं नये. ही चर्चा दोन प्रकारांनीं करावी. ( १ ) कागदपत्रांतील एकंदर माहिती या नात्यानें त्याचें एक परीक्षण, ( २ ) त्यांतील प्रत्येक विधानांचें निराळे परीक्षण. हीं दोन्ही परीक्षणें करतांना, त्यांतील विधानांवर विश्वास ठेवण्यास किंवा न ठेवण्यास काय कारणें असावींत याचा बारकाईनें विचार करावा. कोणतीही खरी गोष्ट, बदलून लिहावयाला कोणीही माणूस कां व कसा प्रवृत्त होतो हें लक्षांत आणून, तशा तऱ्हेची आपल्या लेखाची स्थिति होती काय, किंवा तशी शंका येण्यास जागा आहे काय, याचा विचार झाला पाहिजे.

कर्त्याच्या इमानाविषयीं संशय येण्यास कारणें —( १ ) स्वतःचा स्वार्थ, ( २ ) परिस्थितीचा जोर, ( ३ ) सहानुभूति आणि द्वेष, ( ४ ) फाजील बढाई, ( ५ ) लोकमतास मान, ( ६ ) भाषेचा नोकझोंक. ( १ ) आपला स्वार्थ साधण्याकरितां जाणूनबुजून बनावट लेख लिहिणारे आपल्या पाहाण्यांत थोडेथोडके नाहींत. त्याचप्रमाणें, कधीं कधीं आपला समाज, जात, कुटुंब, प्रांत, देश, धर्म, तट किंवा मंडळी यांचा स्वार्थ साधण्याकरितां, त्यांचा कैवार घेऊन सत्यापलाप करणारे लोक इर्षेस पेटलेले आपण पाहतों. ( २ ) परिस्थितीचा जोर म्हणजे, जेव्हां एकाद्या ठरीव

पद्धतीप्रमाणें कागदपत्र लिहिणें भाग पडलें तेव्हां वरिष्ठांच्या भीतीनें खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें लिहावें लागतें. हें सर्वांस ठाऊक आहेच. उदाहरणार्थ, सर्व देशांतील सरकारी रिपोर्ट. ( ३ ) आपल्या मित्रासंबंधीं सहानुभूति व प्रतिपक्षासंबंधी द्वेष असल्याकारणानें, सत्याचे खून पाडणें बहुतेक मानवी स्वभावाला अनुरूप दिसतें. ( ४ ) स्वतःची शेखी मिरवण्याचे उद्देशानें वाजवीपेक्षां फाजील लिहून सत्याला लपवून ठेवण्याची वहिवाट सर्वांस मशहूर आहेच. ( ५ ) लोकांना अगर काहीं विशिष्ट व्यक्तींना बरें वाटावें म्हणून सत्यापलाप करण्याची जगाची चाल कोणास ठाऊक नाहीं ? केवळ लोकांस बरें वाटावें म्हणून लिहिलेले लेख, ठरीव पद्धतीचीं दरबारी भाषणें, खाविंदचरणीं मिलिंदायमान होणाऱ्या लांगूलचालकांनीं आपल्या आराध्यदेवतेस वाहिलेली प्रशस्तिपत्रें, यांत सत्यदेवतेचा कितपत बोज ठेविलेला असतो, हें आपणांस कोणी सांगावयास नको. ( ६ ) सत्याचा चुराडा केवळ भाषेच्या झोंकाखालीं केलेलाही आपणांस माहित आहेच. तेव्हां, अशांतली कांहीं स्थिति आपल्या कर्त्यासंबंधीं झालेली आहे कीं काय, याचा विचार झाला पाहिजे.

माहिती बरोबर नाहीं, असा संशय येण्यास कारणें — ( १ ) कर्त्यानें त्या गोष्टीचें नीट निरीक्षण केलें नसल्यामुळें, त्यानें तिचें केलेलें वर्णन अवास्तव किंवा चुकीचें असण्याचा संभव आहे. याला दोन तीन कारणें असतात. एक त्याचें मन शुद्ध नसतें. दुसरें, तसें न करण्याविषयीं त्याचें मन कोणी वळविलेलें असतें. तिसरें, त्याचा स्वतःचा निष्काळजीपणा. ( २ ) कर्त्याला चांगले निरीक्षण करतां येण्यासारखी स्थिति नव्हती. कर्त्याला कोणत्याही गोष्टीचें चांगलें अवलोकन करतां येण्याला कशी स्थिति लागते, हें आपणांस ठाऊक आहे. चांगल्या रीतीनें दिसेल, अशा ठिकाणीं त्यानें बसलें पाहिजे. स्वतःचा स्वार्थ अगर पूर्वग्रह यांचें त्यावेळेस अस्तित्व नसलें पाहिजे, इत्यादि. ( ३ ) हलगर्जीपणानें किंवा आळसानें खरा मजकूर लक्षांत न राहून काल्पनिक लिहिलेला आहे. कारण जी माहिती आपणांस मिळाली किंवा जी गोष्ट आपण पाहिली, ती लागलीच टिपून टेविली नाहीं, तर विस्मृतीमुळें तींत पुष्कळ दोष येणें स्वाभाविक आहे. ( ४ ) प्रत्यक्ष अवलोकन करतां येण्यासारखी गोष्ट नव्हती. उदाहरणार्थ लढाया. त्यानें जरी आधीं त्या पाहिल्या असतील, तरी देखील त्यांतील वर्णनें सदोष निघावयाचींच. लढायांचीं वर्णनें, दोन्ही दळांची संख्या, एकमेकाचा नाश ह्या गोष्टींवर सहसा विश्वास ठेवितां येत नाहीं. ( ५ ) दंतकथा व आख्यायिका ह्यांच्यावरून कधीं कधीं कर्त्यानें माहिती घेतलेली असते. तेव्हां ती माहिती तो प्रत्यक्ष अवलोकन करून मिळवीत नाहीं.

एखादी गोष्ट इतकी ठोकळ व सर्वश्रुत असते कीं, तत्संबंधीं सत्यापलाप करणें अशक्य असतें. आनंदीबाईनें नारायणराव पेशव्यास मारिलें, ही गोष्ट आबालवृद्धांस मशहूर आहे. आतां ह्या गोष्टीसंबंधानें एखाद्या आनंदीबाईच्या पक्षाच्या मनुष्यानें जरी एखादा कागद लिहिला असता तरी त्याला ही गोष्ट लपवितां आली नसती. कारण लबाडी केली तर ती बाहेर आल्यावाचून राहणार नाहीं, हे त्यास पक्के ठाऊक !

अशा रीतीनें विचार करून कर्त्याच्या इमानाविषयीं व त्यानें दिलेल्या माहितीच्या खरेपणाविषयीं चर्चा करावयाची. त्याचा सारांश येणेंप्रमाणें — आपल्याला काम करावयाचे तें हें : कागद घ्यावयाचा; तो वाचावयाचा; वाचतांना मजकुराचें मनांत पृथक्करण करावयाचें; कर्त्याची भाषापद्धति व वर्णनाच्या खुब्या वगैरे सर्व टाकून तो काय म्हणतो, हें अगदीं साध्या शब्दांत मनांत अगर कागदावर ग्रथित करावयाचें. असें करण्याचें कारण भाषेच्या मोहकपणानें किंवा लिहिणाराच्या पेचांनीं व खुब्यांनीं वस्तुस्थितीसंबंधीं मनावर विपरित ग्रह होऊं नये, हें होय. अशा रीतीनें कागदांतील मजकुराचें पृथक्करण करून जें आपणांस मिळतें, ते कर्त्याचे विचार व त्यानें सांगितलेल्या ऐतिहासिक गोष्टी, हें होय.

नंतर त्यानें केलेल्या विधानासंबंधीं विचार करावयाचा. त्यानें लिहिलें हें खरें लिहिलें आहे काय किंवा त्यांत चूक अथवा खोटेपणा झाला आहे ? कर्त्याचे मनाची स्थिति कशी होती, त्याला खोटें लिहिण्यासारखी परिस्थिति आली होती काय, इत्यादि मागें सांगितलेल्या प्रश्नांची मालिका मनांत सारखी जागृत असली पाहिजे. प्रथमतः हें जरा चमत्कारीक व जड वाटेल; पण संवयीनें तें लवकरच अंगवळणी पडून त्याचा जडपणा व चमत्कारिकपणा नाहींसा होईल. एवढेंच नव्हे, तर पृथक्करण व बारीक चर्चा ही एक मनाची स्वाभाविक प्रवृत्तीच होऊन बसेल.

## ( ११ ) विशेष गोष्टींचा निर्णय

कर्त्याचे समज बरोबर असोत किंवा चुकीचे असोत व त्याचीं वर्णनें कितीही काल्पनिक असोत, त्यांचा आपणांस कांहीं तरी विचार करणें अवश्य आहे. कारण त्यांचे मुळांशीं सत्याचा कांहीं तरी अंश आपणांस सांपडल्याशिवाय राहणार नाहीं. कल्पनेनें आपण अगदीं नव्या गोष्टी उत्पन्न करतों, असें मुळींच नाहीं. त्यांतील मुख्य तत्त्व खऱ्या गोष्टीपासूनच घेतलेलें असतें. एखादा ग्रंथकर्ता काल्पनिक वर्णनें लिहितो. तीं त्यानें पाहिलेल्या किंवा त्याच्या अनुभवास आलेल्या खऱ्या व वास्तव गोष्टींपासून रचलेलीं असतात. तो दुसरीं नवीन कोठलीं तयार करणार ? काल्पनिक

वर्णनांतलें हें बीजभूत असलेलें वास्तव ज्ञानाचें तत्त्व आपणांस निराळें काढतां येण्यासारखें आहे.

ज्या कालचे कागदपत्र बहुतेक ' नाहीं 'च्याच सदरांतले आहेत. उदाहरणार्थ प्राचीन काल. त्या काळची कांहीं ऐतिहासिक माहिती मिळवावयाची असल्यास त्यास सामुग्री म्हटली म्हणजे, त्या काळचे ' वाङ्मय '—काव्यें, नाटकें, कादंबऱ्या इत्यादि होय. ह्या सामुग्रीपासून ऐतिहासिक माहिती गोळा करण्याची पद्धति ' सशास्त्र ' आहे. पण तिला कांहीं सीमा आहे. ती विसरून तिचें उल्लंघन होण्याचा फार संभव आहे. एतदर्थ, तत्संबंधीं कांहीं विचार येथें करितों.

( १ ) कर्त्यानें केलेलें नैतिक स्थितीचें वर्णन अगर दुसरें कसलेंही वर्णन त्या वेळचे समाजास सर्वस्वी लागू करतां येत नाहीं. तें कदाचित कर्त्याचें व्यक्ति-विषयकही असण्याचा संभव आहे. त्या वर्णनावरून त्याकाळचे सबंध स्वरूप त्या बरहुकूम असेल, अशी कल्पना करण्याला निदान त्या काळचे, त्या ग्रंथकाराचे समकालीन दुसरे ग्रंथकार काय म्हणतात याच्याशीं दुसऱ्यांचें म्हणणें ताडून पाही-पर्यंत तरी दम धरिला पाहिजे.

( २ ) ग्रंथकर्त्यानें वर्णन केलेली स्थिति कधीं कधीं केवळ कल्पनामय असण्याचा संभव आहे. त्यांतील तत्त्वें काय तीं खरीं असतात, एवढें आपणांस ठाऊक आहे. एखाद्या कवीनें आपल्या काव्यांत सोन्याचे दरवाजे व रुप्याच्या ढाली यांचें वर्णन केलेलें आपण वाचलें म्हणजे, त्यापासून त्यावेळेस खरोखरीच सोन्याचे दरवाजे व रुप्याच्या ढाली होत्या, असें अनुमान आपणांस काढतां येणार नाहीं. दरवाजे व ढाली व सोनें व रूपें यांचे निरनिराळे अस्तित्व मात्र खास होते, एवढें कायतें निश्चित सांगता येईल; या पलीकडे खात्रीलायक असें कांहींच सांगतां येणार नाहीं. म्हणून, कर्त्याच्या अनुभवास आलेलीं तत्त्वें पृथक् पृथक् होईपर्यंत आपण पृथक्करणाची मजल पोंचविली पाहिजे. त्यापासून त्या वेळचे, त्या तत्त्वाचे उपयोगही कळण्याचा आपणांस संभव आहे.

( ३ ) कोणत्याही गोष्टीची अगर कृतीची त्या वेळेस कल्पना होती, एवढ्या-वरून तिचें अस्तित्व सिद्ध होईल; पण म्हणून ती सर्वसाधारण होती असें कधींही म्हणतां येणार नाहीं. ती गोष्ट किंवा कृति कदाचित अद्वितीय अथवा फारच थोड्या लोकांना माहित असणारी असेल. कवी आणि कादंबरीकार यांस जगाच्या अपवादक भागापैकीं आपलीं वर्णनभूत पात्रें घेण्याची फार आवड असते.

( ४ ) अशा पद्धतीनें मिळालेल्या माहितीसंबंधीं कधीं कधीं कालनिर्णय व

स्थलनिर्णय करणें कठीण असतें. कर्त्यानें ती माहिती दुसऱ्या देशांतील व दुसऱ्या काळांतील घेतली असण्याचा संभव आहे.

सारांश, कोणत्याही ग्रंथकाराच्या वेळच्या सामाजिक स्थितीचें एखाद्या वाङ्मयात्मक ग्रंथावरून अनुमान काढण्यापूर्वी एखाद्या अर्वाचीन कादंबरीपासून तिच्या समकालीन रितीभातीविषयीं अनुमान करणें कितपत योग्यतेचें होईल, याचा ज्याचा त्यानें आपल्या मनाशीं किंचित विचार करावा. दुसऱ्या पक्षीं, ग्रंथकर्त्याचीं विधानें. ग्रंथकर्त्यानें केलेलें स्पष्ट विधान त्याचा खरेपणा ठरविण्यास पुरेसें नाहीं. कारण, चूक किंवा लबाडी याचा त्यांत अंतर्भाव होण्याचा संभव आहे. आतां, बारकाईनें चर्चा केली असतां, अमका एक निश्चित निकाल लागेल असें कधींही होणार नाहीं. आपणांस चुका होऊं द्यावयाच्या नसल्यास, चर्चा करणें अगदीं जरूर आहे. प्रत्यक्ष सत्यप्राप्ति करून देण्यास चर्चा ही अपुरी आहे. चर्चेनें कोणतीही गोष्ट सिद्ध होणार नाहीं. ती अमक्या एका गोष्टीची संभवनीयता सांगूं शकेल. तिचें काम म्हटलें म्हणजे, कागदपत्रांचे पृथक्करण करून निघणाऱ्या विधानांवर 'असमंजस', 'संशयित', 'चुकीचें', 'खोटें', 'खऱ्याची संभाव्यता' इत्यादि योग्यतेचे शिक्के ठोकावयाचे.

चर्चेमुळें भ्रामक व चुकीची माहिती उघड्यावर येऊन तिचा नाश होतो. पण तिच्या बदली खरी माहिती आणून बसविण्याची तिची शक्ति नाहीं. चर्चेपासून खात्रीलायक होणारे निर्णय सर्व नकारात्मक असतात, 'असें नाहीं' एवढें मात्र तिला खात्रीनें सांगतां येतें; पण 'कसें आहे' हें तिला सांगता येत नाहीं. तरी 'कसें असावें' हें तिला नक्की सांगतां येते, हें काय थोडें आहे !

जी विधानें व अनुमानें आपण काढतों, त्यांना पुष्कळ पुरावा असला म्हणजे त्यांचा उपयोग 'शास्त्रीय ऐतिहासिक ग्रंथ' लिहिण्याचे कामीं करावयाचा. याकरितां निरनिराळ्या पुराव्यानिशीं एकच विधान खरें ठरल्यावांचून, तें शास्त्रीय रचनेचे कामीं उपयोगाचें नाहीं. पण, जेथें आधार नाहीं व तें एक विधान करणारा तो एकच ग्रंथकार आहे, तर तें आपणांस टाकून देतां येत नाहीं. अमका ग्रंथकार अमुक म्हणतो म्हणून तें नमूद करणें भाग आहे. बाकीच्या शास्त्रांत चांगल्या पुराव्यावांचून कोणतीही गोष्ट दाखल करीत नाहींत. तें त्यांचें करणें बरोबर आहे; पण इतिहासशास्त्रज्ञांस तसें करतां येत नाहीं.

दुसरी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. जर दोन विधानें अगदीं एकसारखीं नसलीं, पण साधारणपणें जवळ जवळ सारखीं असलीं तर, दोहोंमधला भावांश घेऊन निराळें आपल्या पदरचेंच तिसरें एक विधान उत्पन्न करणें बरोबर

नाहीं. निरनिराळे कागदपत्र निरनिराळ्या तऱ्हेनें तीच ऐतिहासिक गोष्ट सिद्ध करीत असल्यास, प्रथमतः ते कागदपत्र अगदीं एकमेकांपासून भिन्न आहेत, त्यांचा एकमेकाशीं संबंध नाहीं, किंवा ते एकाच मनुष्यानें लिहिलेले नाहींत, इत्यादि शंकेचें निरसन करून घ्यावें.

असंभवनीयता, ही शास्त्रीय कल्पना नव्हे. ती व्यक्तीप्रमाणें बदलण्याचा संभव असतो. साधारणपणें आपला ज्याच्याशीं परिचय नाहीं, अशी गोष्ट प्रत्येकास असंभवनीय वाटते. एखाद्या शेतकऱ्याला ' टेलिफोन ' म्हणजे केवळ असंभवनीय वाटेल. ' बर्फ ' अशी वस्तु अस्तित्वांत असणें संभवनीय नाहीं, असें सयामच्या राजास वाटलें ! म्हणून कोणती गोष्ट कोणांस असंभवनीय वाटते, हें नक्की कळणें महत्त्वाचें व जरूरीचें आहे. शास्त्रज्ञानविरहित जनसमूहाला ती असंभवनीय वाटते काय ? असें असेल तर या लोकांची असंभवनीयतेची कल्पना कुचकामाची होय. कारण त्यांना सर्वच असंभवनीय वाटतें. प्रत्यक्ष ज्ञानाचीं शास्त्रें देखील त्यांस असंभवनीय वाटतात ! शास्त्रीयज्ञानाच्या मनुष्याला असंभवनीय वाटणारी गोष्ट शास्त्राच्या नियमाला विरुद्ध असली पाहिजे. आणि असें जर खचीत असेल, तर ती गोष्ट आपणांस असंभवनीय मानणें भाग आहे. कारण इतिहासाची अप्रत्यक्ष अवलोकनाची पद्धति इतर शास्त्रांच्या प्रत्यक्ष अवलोकनपद्धतीहून अर्थात गौण आहे. आणि जेथें इतिहासाचें व या शास्त्राचें पटणार नाहीं, तेथें इतिहासानें हार खाणें भाग आहे.

## ( १२ ) उपसंहार

इतिहास लिहिण्यास मुख्य साधन कागदपत्र होत; परंतु कागदपत्र अस्तित्वांत असणें किंवा नसणें आपल्या स्वाधीनचें नाहीं. तथापि काळाच्या भयंकर तडाख्यांतून जे कांहीं कागदपत्र वांचले असतील ते जमा करून, त्यांवर आपला निर्वाह करणें, हें आपल्या स्वाधीनचें आहे. तर मग, जे आपल्या स्वाधीनचें आहे, तें करण्याचें कामीं आपण कसूर करतां कामां नये, कसूर केल्यास महा दोषास पात्र होऊं.

जसजसा जास्त काळ लोटत आहे, तसतसा कागदपत्रांचा जास्त क्षय होऊन त्यांचा लोप होत आहे. जे कागदपत्र नाहींसे झाले, त्यांच्या जागीं नवे येण्याची आशा नाहीं. तेव्हां, जे कांहीं थोडे थोडके कागदपत्र अद्याप मिळण्यासारखे असतील, त्यांचा ' सुरक्षित संग्रह ' करून त्यांस आपण नीट जपलें पाहिजे. कारण, आपल्या इतिहासशास्त्राची सर्व मदार त्यांच्यावर आहे. इतिहासशास्त्राची जास्त प्रगति होण्याची आशा दिसत नाहीं. कारण, त्यांचा जीव जे कागदपत्र यांचा

आपणांजवळील भरणा फारच अल्प आहे, यापेक्षां तो भरणा जास्त होण्याचा संभव नाहीं. सर्व कागदपत्र शोधून, त्यांस उपयोगांत आणण्यांत योग्य अशी कृति केल्यावर चर्चेचें काम संपलें. प्रगत प्राचीन काळच्या कागदपत्रांचा आपणांजवळचा संग्रह अगदीं तुटपुंजा आहे. व एक दोन पिढ्यांतच प्राचीन काळच्या ऐतिहासिक शोधासंबंधीं चाललेल्या प्रयत्नांस विराम पावावें लागणार आहे. त्या दिशेनें इतिहासकारांची गति कुंठित झाल्यावर त्यांस आतां दिवसेंदिवस अर्वाचीन काळाचा अधिकाधिक आश्रय घ्यावा लागेल. अशा रीतीने एकोणिसाव्या शतकांतील कल्पनेच्या वातावरणांत उंच उंच भराऱ्या मारणारांचा इतिहासाच्या अभ्यासासंबंधीं दांडगा आवेश व मनोरथ यांचा या वस्तुस्थितीच्या वास्तविक ज्ञानानें चुराडा होऊन जाणार आहे!! इतिहास प्रत्येक जातीच्या व समाजाच्या तळाचा अगदीं ठाव काढील, व मानवी जातीच्या उत्पत्तीपर्यंत आपण छडानूछडा माहिती काढीत जाऊं. या त्यांच्या आशा सफळ होण्याचा बिलकूल संभव नाहीं. कागदपत्रांच्या अभावामुळें इतिहासाच्यानें हा ठाव काढवत नाहीं, एवढेंच नव्हे, तर अर्वाचीन काळच्या फारसे पलीकडे जाण्याची देखील त्यास चांगलीशी शक्ति नाहीं. यामुळें या मंडळींच्या कल्पनातरंगांचे बाष्पीभवन होऊन त्यांना अंतर्धान पावणें भाग आहे.

दुसऱ्या शास्त्रांप्रमाणें इतिहासशास्त्राची सामग्री इतिहासकार खुद्द स्वतःच्या अवलोकनानें जमा करीत नाहीं; मागील शोधकांनीं जमा करून सादर केलेल्या माहितीवर तो आपलें काम करतो. इतर शास्त्रांतल्याप्रमाणें इतिहासशास्त्रांतलें ज्ञान प्रत्यक्षरीतीनें मिळत नाहीं, अप्रत्यक्ष रीतीनें मिळतें. इतिहासशास्त्र हें अवलोकनाचें शास्त्र नसून विचारपद्धतींचे व तर्कशक्तीचें शास्त्र आहे.

कोणत्याही ऐतिहासिक गोष्टी खऱ्या मानण्यापूर्वी त्यांची संशोधनाची पद्धति आपणांस ठाऊक नसल्यास त्यास चर्चेची कसोटी लावली पाहिजे. कागदपत्रांचा शोध, चर्चा व त्यापासून इतिहास लिहिणें, हीं कामें भारी श्रमाची आहेत. यास्तव इतिहासशास्त्रांत श्रमविभागाचें तत्त्व चांगलें पाळलें पाहिजे. जे विद्वान कागदपत्रांच्या शोधांत गुंतले असतील त्यांनीं सशास्त्ररीतीनें आपले सर्व काम करून इतिहास लिहिण्यास इतिहासकाराला जय्यत तयारी करून द्यावी. कोणत्याही श्रमाची कमतरता त्यांत ठेवूं नये. जे कोणी या मिळविलेल्या ऐतिहासिक गोष्टींवरून शास्त्रीय पद्धतीनें इतिहासाची रचना करण्यांत गढून गेले असतील, त्यांनीं आपलें काम एकनिष्ठपणें करावें. परंतु विशेषतः इतिहासशास्त्राचा ज्यास जास्त अनुभव आला असेल, अशा विद्वानांनीं शोधाच्या कामांत न पडतां इतिहास

रचनेच्या अतिशयित महत्त्वाच्या व कठीण कामांत आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करावा, हें इष्ट होय. अनुभविक व शास्त्रीयज्ञानाच्या लोकांनीं इतिहासरचनेचे काम हातीं घेतल्यामुळें तो चांगल्या शास्त्रीय पद्धतीनें लिहिला जाऊन सामाजिक उत्क्रांतीसंबंधानें वगैरे काढावीं लागणारीं अनुमानें त्याचीं पुष्कळ बरोबर निघण्याचा संभव आहे. नवशिक्या लोकांपेक्षां त्याच्या हातून हजारों पटीनें चुकी होण्याचा संभव कमी आहे. अशा रीतीनें तयार होऊन निघणारें इतिहासग्रंथ खरे व शुद्ध शास्त्रीय होऊन, इतिहासशास्त्रास केवळ ललामभूत होणारे आहेत.

ईश्वरकृपेनें असा एक दिवस येईल कीं ज्या दिवशीं सर्व कागदपत्र शोधून शुद्ध करून व त्यांची चर्चा करून तयार झालेले आहेत. एकही कागदपत्र बाकी राहिलेला नाहीं; तो दिवस इतिहासशास्त्राच्या केवळ्या भाग्याचा होय! त्या दिवशीं इतिहासाची स्थापना झाली, असें म्हणावयाचें. इतिहासशास्त्राचा आपणांस पुष्कळ दिशेनें उपयोग आहे. परंतु तत्संबंधीं कित्येकांच्या भ्रामक समजुती आहेत, त्यांचा आधीं निरास केला आहे.

लोकांना रोजच्या आयुष्यांत प्रत्यक्ष उपयोगी पडणारें व्यावहारिक ज्ञानाचे धडे इतिहासशास्त्रापासून शिकतां येतात, असा कित्येकांचा समज आहे. परंतु हा निव्वळ भ्रम आहे. मानवी कृति एकाच स्थितींत अशा क्वचित घडतात. तेव्हां इतिहासांत घडलेल्या प्रसंगाबरहुकूम प्रत्यक्ष दुसरा प्रसंग तुमच्या आयुष्यांत घडून त्या वेळीं त्या ऐतिहासिक प्रसंगाचा धडा तुम्हांला उपयोगी पडेल, असा योग येणें संभवत नाहीं. आमचें असें म्हणणें आहे कीं, ऐतिहासिक ज्ञानाचा प्रत्यक्ष नाहीं, पण अप्रत्यक्ष असा पुष्कळ उपयोग आहे.

सध्यां ज्या गोष्टी आपण पाहातों, त्यांचें मूळ कसें आहे व कोठें आहे, याची माहिती आपणांस इतिहासशास्त्र देतें. पण इतिहासाचे सर्व काळ सारखे मनोरंजक व महत्त्वाचे नाहींत. कांहीं राजकीय संस्थांचा उगम आपणांस अगदीं प्राचीन काळांत सांपडतो. परंतु त्याचें हल्लींचें स्वरूप बनण्यास गेल्या शंभर वर्षांतील त्यांची झपाट्याची प्रगती कारण आहे. यामुळें, त्यांच्या संबंधींचा या शंभर वर्षांतला इतिहास जसा मनोवेधक व महत्त्वाचा वाटेल, तितका मागील वाटणार नाहीं, हें उघड आहे. त्याप्रमाणें समाजाची गोष्ट आहे. गेल्या शंभर वर्षांत सुधारलेल्या व नांवारूपास आलेल्या प्रत्येक समाजाची वाढ व सुधारणा सारखी झपाट्यानें झालेली आहे. यामुळें गेल्या शंभर वर्षांचा इतिहास मागील दहा शतकांच्या इतिहासाहूनही फार महत्त्वाचा झाला आहे.

सामाजिक व राजकीय शास्त्रांच्या पूर्ततेला इतिहासाचा उपयोग आहे. त्यांचे आजला दिसणारें स्वरूप कसें बनत आलें आहे, याची माहिती म्हणजे 'इतिहास आपणास जरूर हवा.'

परंतु सर्वांत इतिहासशास्त्राचा गुण हा आहे कीं, तें मानसिक सुधारणेचें उत्तम साधन आहे. मानसिक सुधारणेच्या कामीं त्याचा कित्येक दिशांनीं उपयोग आहे. प्रथमतः, ऐतिहासिक शोध करण्याच्या शास्त्रीय पद्धतीशीं परिचय झाल्यानें मनाचा भोळेपणा, किंवा कोणत्याही गोष्टीवर सारासार विचार न करतां चटकन विश्वास ठेवावयाचा, हा जो मानसिक रोग तो नाश पावतो. नंतर निरनिराळे समाज, भिन्न रूढि, चमत्कारिक देशाचार यांची आपणांस माहिती होऊन मन प्रगल्भ व बहुश्रुत होतें. त्याचप्रमाणें समाजांत फेरबदल कसा होत जातो व चालीरीती कशा बदलत असतात, हें कळून येऊन कालमानाप्रमाणें समाजांत होणाऱ्या फेरबदलाविषयीं वाटणारें निरर्थक भय पार नाहींसें होतें. सारांश, सामाजिक सुधारणेला इतिहासशास्त्राची फार मोठी मदत आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७५९५३ वि: [illegible]
क्रमांक 29310 नों: दि: 22131७1

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९८३५९
दा. [illegible]

REFBK-0014379